त्यांस भ्रांति झाली; तशांत त्यांची स्त्री निवर्तली यामुळें तिचे मागून थोडकेच दिवसांनीं ते विंचुर मुक्कामीं परलोकवासी झाले.

पांचवे पुत्र खंडेराव विठ्ठल हे शाहाणे व चतुर होते. ते लिहिण्याचे, जाबजबाबी व हिशेबी कामांत फार प्रवीण असून शिवाय व्युत्पन्नही होते; परंतु शरीरानें अशक्त असल्यामुळें ते शिपाईगिरीचे कामांत लक्ष्य देत नसत. यामुळें त्यांचे हातून सांगण्यासारखें महत्कृत्य मुळींच झालें नाहीं. हे वडील बंधु शिवाजीपंतबापू यांचे आज्ञेंत वागून त्यांचे मर्जीस फार जपत असत, त्या कारणानें त्यांजवर वडील बंधूचा बहुत लोभ असे. कांहीं कालानें शिवाजीपंत बापू यांचा देहांत झाल्यावर पुढें त्यांसच सरदारीचीं वस्त्रें पेशवे यांजकडून मिळालीं; व त्यांचेच वंशज अद्याप विंचूर संस्थानचे मालिक आहेत.

विठ्ठल शिवदेव यांचे पदरीं कोण कोण माणसें होतीं, व दौलतीची व फौजेची व्यवस्था कशी चालत होती याचा खुलासा येथें लिहिणें अवश्य आहे, याकरितां तो पुढें लिहितों:—

१. चिमणाजी खंडेराव हे ऋग्वेदी अश्वलायन शाखेचे ब्राम्हण व खेड तालुक्यांतील भीमातीरचें पिंपळगांव येथील कुळकर्णी होते. हे मोठे शूर असून व्यवहारांत अत्यंत निष्णात होते. यांजकडे पेशव्यांकडील वकीली असून हरएक स्वारीचा सर्व बंदोबस्त ठेवण्याचें काम त्यांजकडेसच होतें. दरएक लढाईचे प्रसंगीं यांजकडून पुष्कळ शूरत्वाचीं कामें झालीं. विठ्ठल शिवदेव यानीं श्रीमंतास विनंति करून पाटोदें माहालीं नांदेसर नांवाचा आठशे रुपये आकाराचा एक गांव त्यांस इनाम देवविला; शिवाय आपले विंचूर व सायखेडें या दोन इनाम गांवापैकीं प्रत्येकांत शंभर रुपये आकाराची इनाम जमीन व इतर गांवीं सनदी शेतें अशी त्यानीं त्यास स्वतः दिली. ह्या जमिनी व शेतें त्यांजकडे अद्यापपर्यंत चालत आहेत. चिमणाजी खंडेराव यानीं आपलें वतनाचें गांव पिंपळगांव येथें एक मोठा वाडा व भीमेचे कांठीं

घाट व शिवालय असें बांधिलें तें कायम आहे. विंचुरापासून कांहीं कोसांचे अंतरावर त्यानीं पालखेड गांवीं कुळकर्ण खरेदी घेतलेलें असून हालीं त्यांचे वंशज उभय गांवीं म्हणजे पिंपळगांव व पालखेड येथें राहात आहेत व श्रीमंतानीं दिलेल्या इनामी गांवाचा व विठ्ठल शिवदेव यानीं दिलेल्या इनाम जमिनींचा व सनदी शेतांचा उपभोग घेऊन अद्यापि विंचूर संस्थानांत नौकरी करीत आहेत.

२. विठ्ठल त्रिंबक व नारो त्रिंबक सालकाढे हे ऋग्वेदी अश्वलायन शाखेचे ब्राम्हण होते. ते वाईप्रांतीं चंदन वंदन म्हणून गांव आहे तेथील राहाणारे असून त्यांजकडे सर्व दौलतीचा कारभार होता; शिवाय विठ्ठल शिवदेव यांचे कबजांतील किल्यांची देखरेखही त्यांजकडेसच होती. त्यांचे वंशांत पुष्कळ नामांकित राजकार्यधुरंधर पुरुष उत्पन्न झाले. विठ्ठल शिवदेव यांचे कारकीर्दीपासून आजपर्यंत विंचूर संस्थानचा कारभार त्यांचेच वंशजांकडे आहे. याच घराण्यांत बाळोबा बावा हे उत्पन्न झाले. विंचूरचे दौलतीचा कारभार त्यांजकडेसच होता. शिवाय शेवटचे बाजीराव यांचे कारकीर्दींत पेशव्यांचे राज्यांतील बहुतेक मसलती यांचेच विचारानें चालत होत्या हें सर्व प्रसिद्ध आहेच. नर्मदा नदीचे कांठाजवळ शेवटचे बाजीराव पेशवे हे मालकम साहेब यांचे ताब्यांत गेले त्या वेळेस बाळोबा बावा हे विंचूरकर यांची पागा घेऊन ब्रम्हवर्तापर्यंत गेले. ती पागा बाजीराव साहेब यांचें अंतकाळपर्यंत बाळोबा बावा यांचे चिरंजिवाकडे चालत होती. बाजीराव साहेब जिवंत असतां बाळोबा बावा हे त्यांची आज्ञा घेऊन काशीस गेले. त्यांस इंग्रज सरकाराकडून सालिना ३००० रुपयांचें पेनशन् मिळालें होतें, त्याजवर त्यांनीं कांहीं वर्षें पर्यंत काशी क्षेत्रीं निर्वाह केला; नंतर संन्यास ग्रहण करून ते समाधिस्थ झाले. त्यांचे चुलत बंधु यमाजीपंत अण्णा यांनीं बहुत वर्षेंपर्यंत विंचूर संस्थानचे पोतनिशीचें काम केलें आणि शेवटीं दक्षिणेंत इंग्रजी अंमल होण्याचे

सुमारास त्यांनीं काशीवास करून पुष्कळ देवालयें व घांट बांधिले; शिवाय कितीएक धर्मकृत्यें करून मोठी कीर्ति मिळविली. त्यांचे चिरंजीव भाऊ पोतनीस यानीं अलीकडे जनकोजी शिंदे यांचे कारकीर्दीत ग्वाल्हेरचे कारभाऱ्याचे हाताखालीं काम केलें.

३ आबुराव विठ्ठल व बाबुराव विठ्ठल हे वाजसनीय शाखेचे यजुर्वेदी ब्राम्हण होते. हे विंचुरानजीक टाकळी व कोटम गांव येथील कुळकर्णी असून शिपाईगिरीचे कामांत मोठे कुशल होते. विठ्ठल शिवदेव यांचे कारकीर्दीत लढाईचे प्रसंगीं यांचे घरण्यांतील पांच सहा पुरुष रणांत पडले. विठ्ठल शिवदेव यांचे कारकीर्दीपासून पेशवे व इंग्रज लोक यांचे आखेरचे लढाईपर्यंत विंचूरकर यांचे फौजेचे सेनापति यांचेच वंशज होत गेले. या वंशाचे पुरुषांस विठ्ठल शिवदेव यांचे वंशज यांनीं चिरंजीवाप्रमाणें मानिलें असून पत्रव्यवहारांतही त्यांस चिरंजिव असें लिहिण्याची अजून वहिवाट आहे. हाल्लीं त्या वंशजांस विंचूर संस्थानांतून रुपये १००० आकाराची जमीन पेन्शनादाखल कोटमगांव वगैरे गांवीं चालत असून ते त्या संस्थानांत नौकरी करीत आहेत.

४ खंडूजी केंजळे हा वांईजवळील केंजळ गांवाचा पाटील असून मराठा होता. तो मोठा प्रामाणिक असल्यामुळें त्याजवर विठ्ठल शिवदेव यांची बहुत कृपा होती. त्याजकडे विठ्ठल शिवदेव यांचे प्रपंचसंबंधीं सर्व काम असून खरेदी केलेल्या वतनांची देखरेख व संरक्षण करणें व नवीन वतनें संपादन करणें हेंही काम होतें. त्यांचे वंशजांस विंचूर संस्थानांतून सनदी शेत दिलेलें असून ते हल्लीं त्या संस्थानांत नोकरी करीत आहेत.

५ विठ्ठल शिवदेव यांचे पदरीं एकंदर ७०० मानकरी शिलेदार होते. त्या सर्वांस चवऱ्या व अबदागिरी व मशाली यांच्या नेमणुका असून घोडयांचे खर्चासुद्धां त्यांचे पगारही मोठे होते. हे सर्व मानकरी लोक मोठ्या प्रसिद्ध मराठे कुळांतील होते, व ढालतलवार व भाला हीं त्यांचीं शस्त्रें असत.

६ पागेंतील सर्व स्वारलोक भाले व ढालतरवारी बांधीत असून त्या कामांत ते प्रवीण असत.

७ पागेंतील बारगिरांचे घोडे पांचशें रुपयांपेक्षां कमी किंमतीचे असूं नयेत असा नेम होता. अशा प्रकारच्या बारगिरांच्या पृथक पागा असत. दरएक पागेंत डंका व निशाण असून तिजवर हुकूम चालविण्यास एक मोठा शूर सरदार असे. त्यास पागे असें म्हणत असत.

८ पायदळांत बहुतेक मेवाती जातीचे मुसलमान असत; ते ढालतरवार बांधून शिवाय बर्च्याही बांधीत असत. ह्याशिवाय हिंदुस्थानांतील रजपूत जातीचे पायदळ शिपाई होते. ते ढालतरवारीखेरीज कडाबिनी बांधीत असून तें त्यांचें मुख्य शस्त्र होतें.

९ विठ्ठल शिवदेव हे दररोज आपले मानकरी व बारगीर यांस बरोबर घेऊन मैदानांत जात असत. त्यावेळेस त्यांजकडून घोडे फिरविणें व बंदुकीनें निशाण मारविणें वगैरे शिपाईगिरीचीं कामें स्वतः करवीत असत. शिवाय शत्रूवर हल्ला कसा करावा व शत्रूपासून आपला बचाव कसा करावा वगैरे गोष्टी त्या काळचे रीतीप्रमाणें ते शिकवीत असत. पेशव्यांचे सरदारांतून कित्येकांत दररोज अशी शिक्षा देण्याची जी वहिवाट होती ती मुख्यत्वेंकरून विठ्ठल शिवदेव यांचीच घेतलेली होती.

अशा प्रकारें हमेषा त्यांजजवळ घोडेदळ व पायदळ मिळून पांच हजार फौज होती. याखेरीज इतलाक फौज (म्हणजे कारणपरत्वें भरती केलेली अधिक फौज) दाहा हजारांपासून पंचवीस हजारांपर्यंत वाढविली जात असे.

जामदारखाना, कोठी, पीलखाना, सुतरखाना* व थट्टी वगैरे हरएक कारखान्यावर देखरेख करण्यास ब्राम्हण होते. खेरीज माहालांत व घरीं काम करण्यास पुष्कळ कारकून असत. याशिवाय उपाध्ये, आश्रित, शास्त्री, ज्योतिषी, पुराणीक, वैद्य अशी ब्राम्हणमंडळी पुष्कळ होती. त्यापैकीं कितीएकांचे वंशज हाल्लीं विंचूरसंस्थानांत नौ-

* उष्टरखाना

कऱ्या करीत आहेत. विठ्ठल शिवदेव यांजकडे कायम फौजेचा व जातीचे लवाजम्याचा सरंजाम व त्याखेरीज कमाविशीनें चालत असलेला मुलुक, शिवाय वतनें वगैरे मिळून एकंदर सुमारें पन्नास लक्षांचा मुलुक होता. त्याची वहिवाट कची ठेवून कारभारी देखरेख पहात असत.

त्या वेळचे मुत्सद्दी मंडळीपैकीं सखारामबापू व चिंतो विठ्ठल रायरीकर यांशीं विठ्ठल शिवदेव यांचा फार स्नेह होता. त्याचप्रमाणें सरदारमंडळींत मल्हारराव होळकर यांशींही त्यांचा अत्यंत मित्रभाव होता. याचें एक चमत्कारिक उदाहरण असें आहे कीं, कधीं कधीं उभयतां एकच मोहिमेवर आपले मालिक पेशवे यांजबरोबर जात असत. कधीं कधीं उभयतांस पेशवे निराळे मोहिमेवर पाठवीत असत; या कारणानें कधीं विठ्ठल शिवदेव दक्षिणेत असून मल्हारराव होळकर हे हिंदुस्थानांत स्वारीवर असत; व कधीं होळकर दक्षिणेंत असून विठ्ठलराव हे उत्तर हिंदुस्थानांत अगर कर्नाटकांत स्वारीवर असत. होळकर दक्षिणेंत असले ह्मणजे त्यांचा मुक्काम बहुतकरून चांदवडासच फार दिवस होत असे. त्या वेळेस विठ्ठल शिवदेव हे स्वारी करून परप्रांतांतून विंचुरास परत आले ह्मणजे होळकर हे मुद्दाम त्यांचे भेटीकरितां विंचुरास येत. विठ्ठलराव हे विंचुरचे पाटील असून होळकर हे चांदवड माहालचे देशमुख होते. आणि विंचूर गांव हें चांदवड माहालापैकीं असल्यामुळें विठ्ठल शिवदेव यानीं आपले विंचूर गांवचे देशमुख आले म्हणून होळकर यांस सामोरें जावे आणि पाटिलकीच्या नात्यानें त्यांची भेट घेऊन त्याचा सन्मान करावा व त्यांस नजर करावी; आणि त्यांस आपले वाडयांत आणून तेथें त्यांचा उत्तमप्रकारें सत्कार करावा. होळकर हे कधीं कधीं विठ्ठल शिवदेव याचे स्नेहसंबंधाचे आग्रहावरून आठ दिवसांवरही विंचुरास राहिलेले कळून येतें. त्याचप्रमाणें विठ्ठल शिवदेव हे चांदवडास गेले

असता ते विंचुरचे जाहगीरदार व आपण विंचूर गांवचे देशमुख समजून होळकर हे देशमुखीचे संबंधानें आपले मालिक आहेत असें मनांत आणून त्यांस सामोरें जात; व त्यांची परमादरानें भेट घेऊन त्यांस नजर करीत; नंतर आपले वाड्यांत नेऊन आग्रहपूर्वक कांहीं दिवस सत्कार करून ठेवून घेत. हा क्रम मल्हारराव होळकर यांचे अंतकाळापर्यंत चालला. होळकर कैलासवासी झाल्याचें वर्तमान विठ्ठल शिवदेव यांस ग्वाल्हेरीस समजल्या वेळेपासून त्यांस जसा कोणी आपले कुटुंबांतील प्रिय मनुष्यच गेला असें वाटून त्यावेळेपासून त्यांची उमेद खचली, आणि व्यवहारांत त्यांस सर्व प्रकारें उदासीनता प्राप्त झाली. तेणेंकरून दिवसेंदिवस ते क्षीण होऊन होळकर यांचे मागून थोडकेच महिन्यांनीं ते परलोकवासी झाले.

विठ्ठल शिवदेव हे फार उंच नसून ठेंगणेही नव्हते. त्यांचा बांधा मजबूत असून त्यांचें शरीर मेहनतीनें कमावलेलें व कसलेलें होतें. त्यांचा रंग काळा होता. त्यांचे शरीराचे मानापेक्षां त्यांचे हात अधिक लांब असत. त्यांचा स्वभाव क्रोधी तर होताच, परंतु विचारी असल्यामुळें ते मनमिळाऊ असत. कुटुंबांतील सर्व माणसें व आप्तमित्र इत्यादिकांबरोबर त्यांचें वर्तन मोठ्या प्रेमाचें असे. त्यांचा रंग काळा होता याविषयीं अशी एक गोष्ट आहे कीं, माहादजी शिंदे हे त्यांस कधीं विनोदानें म्हणत कीं, "तुमचा व आमचा वर्ण एकच आहे असें असून कर्म कां वेगळें झालें हें समजत नाहीं! म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार जाती भिन्न असून त्यांस संस्कृतांत वर्ण अशी संज्ञा आहे व या वर्ण शब्दाचा अर्थ रंग असाही होतो. आतां माझा व तुमचा वर्ण म्हणजे रंग एकसारखा असून माझें कर्म शूद्रांचें कां झालें?" विठ्ठल शिवदेव यांस डामडौल अगदीं आवडत नसे. फौज सोडून बाहेर जाणें झालें तर पंचवीस घोडेस्वार मात्र त्यांजे बरोबर

असत. ते पालखींत अगर हत्तीवर अगर घोडीवर आमरणांत बसले नाहींत. वृद्धावस्थेंतही कसरत केल्याखेरीज त्यांचा दिवस लोटत नसे.

विठ्ठल शिवदेव यांस अ: वामींचा अनुग्रह होता. या कारणानें भगवद्भक्तीकडे त्यांचें लक्ष बहुत असे. स्वतः त्यांनीं केलेलीं पदें व अभंग विंचुरास बहुत उपलब्ध आहेत. शिवाय त्यांचें एकपत्निव्रत मोठें पक्कें असून प्रातःस्नान सीतोदकाचें, हरीहराचीं पूजा, एकादशीस कांहीं न खाणें, हीं तीन व्रतें त्यानीं मोठ्या दृढनिश्चयानें आमरणांत शेवटास नेलीं.

आतां विठ्ठल शिवदेव यानीं धर्मसंबंधी सत्कृत्यें केलीं ती लिहितों:— आपले गुरु आमृतस्वामी यांस मढें येथें एक मठ बांधून दिला; नंतर स्वामी समाधिस्थ झाल्यावर त्या मठांतील ज्या गुहेंत ते बसत होते त्यावर श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ति स्थापिल्या; त्या देवांची पूजा, नंदादीप व रामनवमीचा उत्साह चिरकाळ चालावयाच्या हेतूनें खुद्द आपले जाहगिरीपैकीं चांदगव्हाण नांवाचा अक्रा़शें रुपयांचा गांव त्यानीं तिकडे लावून दिला. हा गांव श्रीगोदातीरीं कोपरगांवानजीक आहे. त्यांचे उत्पन्नाचा व्यय पावनबावाचें वंशज अजूनपर्यंत देवाकडे करीत आहेत.

आपले चालते काळांत शाहूमाहाराज यांचें मढें येथील राहणार बक्षी ह्मणजे ज्यांचे येथें विठ्ठल शिवदेव हे राहून प्रथम उदयास आले त्यांचा कृतोपकार स्मरून यानीं त्यांस आपलेजवळ ठेवून घेतलें आणि त्यांचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेवून शिवाय त्यांस आपले सरंजामापैकीं किती एक माहाली नेमणुका करून दिल्या; त्या इंग्रजी अंमल होईतोंपर्यंत सतत चालल्या.

विठ्ठल शिवदेव यांचे आयुष्याचा बहुतेक काळ सरकारचाकरींतच गेला. कधीं कधीं घरीं राहाण्याचा प्रसंग आला त्या वेळीं त्यानीं कांहीं गांवपाटीलकीचीं व कुळकरणाचीं वतनें

खरेदी केलीं; पाटोदें माहालीं कितीएक गांवचा देशमुखीचा भाग खरेदी केला; त्याचप्रमाणें गुजराथ प्रांतीं कांही गांवचे देसायांचीं वतनें व गोदा व कृष्णा यांच्या तिरीं कांहीं गांवच्या पाटीलक्या खरेदी केल्या; त्या गांवांपैकीं कांहीं गांवीं आपल्या उभयतां वडील बंधुसाठीं दोन विभाग व आपल्या स्वतःसाठीं एक विभाग मिळून तीन विभाग त्यांनीं बरोबर केले. त्या वतनांचा उपभोग त्या त्रिवर्ग बंधूचे वंशज अजून करीत आहेत.

पुराणप्रसिद्ध भीमा आणि निरा या महा नद्यांच्या संगमस्थळीं श्रीनृसिंहाचें स्थान आहे. त्या स्थानाचा सविस्तर महिमा वेदव्यासप्रणीत पद्मपुराणांत सांगितला आहे. तो देव आपला कुलस्वामी, यास्तव त्याचें मंदीर पूर्वी अगदीं लहान होतें व तें वरील दोन्ही नद्यांचे संगमाचे चिमटयांत चिरकाळ राहावें अशा संकल्पानें त्यांनीं फार खोल व मजबूत असा पाया घालून त्यावर भव्य आणि टोलेजंग मंदीर बांधिलें. त्या मंदिरांत ज्या मूर्तीचा महिमा पुराणांत लिहिला आहे अशा प्रल्हादकृत आणि ब्रम्हदेवकृत दोन मूर्ती त्यांनीं सिंहासनावर स्थापिल्या. आणि त्यास बहुमोल जवाहीर समर्पण केलें. तें मंदीर कधीं बांधिलें, याविषयींचा लेख ब्रम्हदेवकृत मूर्तीचे खालच्या सिंहासनावर आहे; तो असाः—

श्रीक्षेत्र निरानृसिंहपूर घाट गाभारा देवालय चरणारविंदीं विठ्ठल शिवदेव दाणी कसबे सासवड प्रांत पुणें शके १६७८ धातानामसंवत्सरे चैत्र शुद्ध १.

त्या नृसिंहस्थानाची पूजा, नैवेद्य, उत्साह वगैरे निरंतर चालावयाच्या इच्छेनें त्यांनीं गुजराथ प्रांतापैकीं सुरत जिल्ह्यांतील उरपाड माहालांतून नेमणूक सालिना रुपये ६,००० ची चालूं केली. पुढें विठ्ठल शिवदेव यांचे नातू नरसिंह खंडेराव यांणीं सदहू नेमणूक निरंतर चालेल अशी सनद करून दिली. नंतर कांहीं काळानें इंग्रजी अंमल झाला तेव्हां सनदेप्रमाणें चालविण्याविषयीं

एल्फिनस्तन साहेब कमिशनर यांनीं विठ्ठल शिवदेव यांचे वंशांतील पुरुषांचे मार्फत देवाचा खर्च निरंतर चालावा अशी सनद करून दिली. त्याप्रमाणें त्यांचे वंशज रघुनाथराव विठ्ठल यांजकडून देवस्थानाचा खर्च व सेवा हल्लीं चालू आहे.

आबुराव शिवदेव व त्रिंबकराव शिवदेव या उभयतां वडील बंधूंस कर्ज होतें तें विठ्ठल शिवदेव यांनीं फेडून उभयतां बंधूंकडून बहुत खर्चानें काशीयात्रा करविली.

विठ्ठल शिवदेव यांनीं पुष्कळ ब्राह्मणांस उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत वर्षासनें व नेमणुका करून दिल्या. त्यांपैकीं अद्यापि कांहीं चालत आहेत.

विठ्ठल शिवदेव यांचे ताब्यांत जो मुलुख होता, त्यांतील कितीएक माहालीं त्यानीं श्रीनृसिंहाचीं मंदिरें व शिवालयें बांधून त्यांचे पूजानैवेद्य यांचे खर्चास नेमणुका करून दिल्या. त्या नेमणुका हाल्लीं चालत आहेत.

श्री गोदातीरीं सायखेडें नांवाचा गांव विठ्ठल शिवदेव यांस इनाम मिळाल्यावर त्यानीं त्या गांवीं श्रीनृसिंहाचें एक उत्तम मंदीर बांधिलें.

याप्रमाणें आम्ही विठ्ठल शिवदेव यांचें वृत्त सादर केलें आहे; यांत ते कोठें व कोणते सालांत जन्मले, आणि त्यानीं शाहू माहाराजांची कृपा कशी संपादन केली, व त्यांचा आश्रय मिळाल्यावर अक्षय्य कीर्ति कशी संपादन केली हें लिहिलें आहे; शिवाय प्रत्येक सालीं या नाशिवंत जगांत त्यानीं कोणकोणते पराक्रम केले ते प्रथम लिहून नंतर पुढें परलोकसाधनाचीं कृत्यें त्यानीं कोणतीं केलीं तीं निवेदन केलीं आहेत.

विठ्ठल शिवदेव यांच्या ऐन उमेदींत म्हटलें तर बाजीराव साहेबांचे घोड्याबरोबर यांचा घोडा उभा असे अशी त्यांची स्थिति होती. बाजीराव साहेबांसारखा मेहनती व कट्टा शिपाई ब्राम्हणांत विरळा. पेशव्यांचे वंशांत असा शूर पुरुष दुसरा झालाच

नाहीं. सारांश विठ्ठल शिवदेव यांस बाजीरावसाहेबांचें वळण लागलें होतें. बाजीराव साहेबानीं वीस एकवीस वर्षें राज्यकारभार करून माळव्यांत आणि उत्तरहिंदुस्थानचे कांहीं भागांत आपला अंमल बसविला. त्यांच्या बहुतेक स्वाऱ्यांत विठ्ठल शिवदेव हे त्यांजबरोबर मसलत व पराक्रम करण्यास होतेच. बाजीराव साहेबांचें व त्यांच्या सरदारांचें शौर्य आणि कारस्थान पाहून शाहूमाहाराज फार खुष झाले; आणि आपलें नांव कायम ठेवून राज्य वाढविण्यास ते फारच उपयोगाचे आहेत असें त्यांस वाटल्यावरून त्यानीं आपला मुलुक काबीज करण्याचा सर्व अधिकार बाजीराव साहेबांचे स्वाधीन केला. शिवाजीमाहाराजानीं राज्यरूपी वृक्ष मोठ्या आस्थेनें लाविला. तो पुढें शाहुमाहाराजानीं बाजीरावसाहेब यांचे स्वाधीन केला. त्यानीं त्यास वेळेवर व मनमुराद पाणीं घातल्यामुळें पुढें त्याचा विस्तार इतका मोठा झाला कीं, त्याच्या शाखा सर्व हिंदुस्थानभर पसरून त्याचीं विपुल फळें भगव्या झेंड्याच्या सर्व सरदारांनीं पुढें स्वतंत्रपणें यथेच्छ सेवन केलीं व अद्यापिही कांहीं करीत आहेत.

भाग दुसरा.

शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांचें चरित्र.

पहिले भागाचे समाप्तीस आह्मीं विठ्ठल शिवदेव यांच्या देहांता-संबंधी मजकूर लिहिला. आतां येथून पुढें त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव शिवाजी विठ्ठल यांचें चरित्र लिहिण्यास आह्मी आरंभ करितों.

विठ्ठल शिवदेव यांचे अंतकाळसमयीं त्यांचे पांच पुत्र, कुटुंबांतील सर्व माणसें, पदरचीं सर्व मंडळी व लष्करांतील सर्व सरदार यांस जें दुःख झालें त्याचें किती वर्णन करावें ? कारण सूर्यास्त झाल्यावर सर्वत्र जसा एकदम अंधःकार होतो त्यासारखा प्रकार तेथें होऊन गेला. असो; शास्त्रोक्त रीतीनें त्यांचें दहन झाल्यावर त्यांचे वडील पुत्र शिवाजी विठ्ठल यानीं तें दुःखकारक वर्तमान श्रीमंत रावसाहेब पेशवे यांस कळविण्यास्तव एक व दिवाण सखाराम बापू यांच्या नांवचें एक अशीं दोन पत्रें देऊन गोविंद लक्ष्मण नांवाचा वकील यास पंचवीस स्वारांनिशीं पुण्यास तावडतोब रवाना केलें. वकील हे तिसरे दिवशीं पुण्यास पोहोंचले. ते प्रथम सखारामबापूंकडे गेले. बापूंस पाहून त्यांस गहिंवर आला. सखारामबापूंनीं विचारिलें कीं, "काय झालें, दुःख कां करतां ?" तेव्हां वकील मजकूर यानीं त्यांस विठ्ठल शिवदेव-यांचे देहांताचें वर्तमान सविस्तर कळविलें. तें ऐकून सखाराम बापूंस फार खेद झाला, आणि ते बोलले कीं, "विष्णूस जसे चार हात तसे आमचे मालिकांस शिंदे, होळकर, विंचूकर आणि

मिरजकर हे चार हात होते; पैकीं मल्हारराव होळकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे गेल्यानें दोन हात आतां कमी झालें. ईश्वरेच्छेस उपाय नाहीं. " असो; नंतर गोविंद लक्ष्मण यांस बरोबर घेऊन सखारामबापू श्रीमंत रावसाहेब यांजकडे गेले. विंचूरकर यांजकडील वकील श्रीमंतांचे दृष्टीस पडतांच त्यांनीं त्यांस विचारिलें कीं, "विठ्ठलराव हे हिंदुस्थानांतून येतांना वाटेंत त्यांची प्रकृति बिघडली होती; तत्रापि ते तसेच विंचुरास पोहोंचल्याची खबर आली. त्याजवर कांहींच कळून आलें नाहीं. आतां प्रकृति कशी आहे ? " तेव्हां सखारामबापूंनीं त्यांस सर्व वृत्त निवेदन केलें. तें ऐकून श्रीमंत फार कष्टी होऊन बोलिले कीं, "झालेले गोष्टीस उपाय नाहीं; तुम्ही दुःख करूं नका. विठ्ठलराव यांचे पांच पुत्र आहेत; त्यांपैकीं शिवाजीपंत हे आपल्या वडिलांप्रमाणेंच सरकारची चाकरी करून तुम्हां सर्व जुन्या मंडळीचा प्रतिपाळ करतील. विठ्ठल शिवदेव गेले ह्मणून कांहीं कमी होणार नाहीं. त्यांचे चिरंजीव शिवाजीपंत यास सरदारीचीं वस्त्रें सत्वर देण्यांत येतील, कारण सरदारी चालविण्यास योग्य असें त्यांस विठ्ठलराव यांणीं आपल्या ह्यातींतच करून ठेविलें आहे. " नंतर त्यानीं सखारामबापू यांस आज्ञा केली कीं, "समाधानार्थ कोणी तरी मनुष्य विंचुरास पाठवावा." मग शिवाजी विठ्ठल यांजकडून आलेल्या पत्राचें उत्तर त्यांनीं गोविंद लक्ष्मण यांजपाशीं देऊन त्यांस परत जाण्यास आज्ञा दिली. तें पत्र असें:—

॥ श्री ॥

राजेश्रिया विराजित राजमान्य राजेश्री शिवाजी विठ्ठल स्वामी गोसावी यांस.

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे. विशेष. पत्र पाठविलें तें

पावलें. विठ्ठल शिवदेव निधन पावल्याचें वर्तमान लिहिलें तें श्रवण होऊन चित्त विक्षेपाप्रत पावलें. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट केली. मशारनिल्हे मातबर मनुष्य सरकार उपयोगीं कार्य कर्ते होते. ईश्वरी तंत्रास उपाय नाहीं. हा मृत्यु लोक, तुम्ही खेद न करणें. विवेक करून क्लेशाचें परिमार्जन करून सर्वांचें समाधान करणें. तुम्ही त्यांचे जागीं आहां. सर्व प्रकारें तुमचें चालविलें जाईल. चिंता न करणें. रवाना चंद्र २२ रब्बिलावल सुरसन सम्मान् सीतैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें. * सारांश कीं, या गोष्टीस कोणाचा उपाय आहे असें नाहीं. बरें. ईश्वरी सत्ता प्रमाण. तुम्हाविषयीं येथें दुसरा विचार नाहीं. तुम्ही सत्वर भेटीस येणें. चंद्र मजकूर. हे विनंती.

मग वकील यांत घेऊन सखारामबापू आपले घरीं आले; आणि तेथें आपल्या स्वतःच्या पत्राचें उत्तर लिहून त्यांचे हवाली केलें. ते उत्तर येणेंप्रमाणें:—

॥ श्री ॥

राजेश्रिया विराजित राजमान्य राजेश्री बापू स्वामीचे सेवेशी.

पोष्य सखाराम भगवंत. कृतानेक नमस्कार विनंती उपरि येथील कुशल तागाईत चंद्र २२ रब्बिलावल पर्यंत जाणून स्वकीये कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. राजेश्री विठ्ठलपंततात्या हिंदुस्थानांतून देशास येतांना मार्गीं शीतज्वराची व्यथा झाली; यामुळें बहुत हैराण झाले; तसेंच विंचुरास मजल दरमजला आले; येथें आल्यावर चार दिवस होते; पांचवे दिवशीं काळ झाला म्हणून लिहिलें. ऐशास ईश्वरें बहुत अनुचित

---

*येथून पुढील मजकूर खुद्द माधवराव पेशवे यांचे स्वदस्तुरचा आहे.

केलें. हें वर्तमान ऐकतांच चित्तास बहुत श्रम झाले. असो; हा मृत्युलोक आहे; ईश्वरी संकेतास उपाय काय ? तुम्हीं धैर्य धरून सर्वांचें समाधान करून कोणेविषयीं चिंता न करणें. तुम्हांविषयीं श्रीमंतांस विनंती केली आहे. चित्तांत दुसरा अर्थ कांहीं न आणावा. श्रीमंतानीं पत्राचें उत्तर पाठविलें आहे; व भेटीचा ही योग सत्वरच त्या प्रांतीं आल्यावर होईल. वरकड कित्येक मजकूर राजश्री गोविंद लक्ष्मण यानीं सांगितले ते कळों आले. सारांश, तात्या गेले; सर्व प्रकारें बाजू गेली; सरकारचाही नाशच झाला; उपाय नाहीं. तुम्ही शिंनरचे आलीकडे येऊन श्रीमंतांस भेटणें. उभयतांच्या भेटी होताच तुम्ही अ.गोदर येऊन भेटणें. अनमान न करावा.बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा.हे विनंती.

शिवाय बापूनीं आज्ञेप्रमाणें शिवाजी विठ्ठल यांच्या समाधानार्थ वकीलांबरोबर सरकारचे उपाध्ये कर्वे व आप्त राजमाचीकर यांस देऊन त्यांची रवानगी करून दिली. उपाध्ये व आप्त विंचूरास पोहोंचल्यावर त्यानीं शिवाजीपंतबापू यांचें सांत्वन केलें आणि गोदातीरीं उत्तरकार्य समाप्त झाल्यावर त्यांस दुखवटयाचीं वस्त्रें देऊन ते पुण्यास परत गेले.

पुढें रावसाहेब श्रीमंत यांची स्वारी गोदातीराकडे येण्यास निघाली, तेव्हां विंचूरकरांचे दिवाण चिमणाजी खंडेराव हे विंचुराहून निघून स्वारी संगमनेराजवळ होती तेथें जाऊन पोहोंचले; आणि त्यानीं श्रीमंतांची भेट घेऊन शिवाजीपंतबापू भेटीस येत आहेत असें त्यांस विनंतीनें कळविलें. श्रीमंतानीं त्यांचें पुष्कळ रीतीनें सांत्वन करून " शिवाजीपंतबापू हुजूर आले म्हणजे त्यांस लागलीच वस्त्रें व मुलुकाच्या सनदा द्यावयाच्या आहेत, याकरितां त्या देण्याची तयारी करून ठेवावी. " अशी सखारामबापू यांस आज्ञा केली. नंतर श्रीमंतांची स्वारी तेथून निघून नाशिकाजवळ आनंदवल्ली येथें गेली. त्या स्वारीबरोबर चिमणाजी खंडेराव

होतेच. हें वर्तमान शिवाजीपंतबापू यांस कळतांच त्यानीं आपले चार बंधु, मानकरी व इतर पदरची मंडळी यांसह स्वारींत जाऊन श्रीमंतांची भेट घेतली. श्रीमंतानीं त्यांस अश्वासन देऊन पुष्कळ प्रकारें त्यांचे सांत्वन केलें; आणि त्याच वेळेस सरदारीचीं वस्त्रें व माहालांच्या नव्या सनदा देऊन आज्ञा केली कीं, "स्वारी लवकरच पुण्यास परत जात आहे. तुम्ही विंचूरास माघारें जावें आणि घरची सर्व व्यवस्था करून फार लवकर पुण्यास यावें." दुसरे दिवशीं शिवाजी विठ्ठल श्रीमंतांचा निरोप घेऊन विंचुरास परत आले. त्यांचे पदरची मंडळी व गांवांतील सर्व लोक व फौजेंतील सरदार यांनीं तो दिवस आनंदाचा मानून उत्साह केला. पुढें थोडकेच दिवसांनीं शिवाजी विठ्ठल पुण्यास जाऊन आपले सरदारीचें कामकाज पाहूं लागले, आणि वडिलांचे वेळेस जें काम ज्याकडे होतें तें त्याकडेसच कायम ठेवून सर्व पदरचे मंडळीवर बहुत प्रेम करूं लागले. त्या योगानें विठ्ठलराव गेल्याचे कारणानें झालेलें दुःख विसरून सर्व लोक एकनिष्ठेनें सेवा करूं लागले.

पुढें सुमारें दोन वर्षांनीं म्हणजे सन १७६९ इसवी सालीं पेशवे यानीं आपलें पानिपतच्या लढाई मुळें उत्तरहिंदुस्थानांत नष्ट झालेलें वर्चस्व पुनः स्थापनकरण्यास्तव बिनीवाले, शिवाजी विठ्ठल विंचूरकर, माहादजी शिंदे व तुकोजी होळकर यांस त्या प्रांतीं पाठवून दिलें. पूर्वीं उत्तर हिंदुस्थानांत अबदाली बादशाहा येऊन पानिपत येथें संपूर्ण मराठे राष्ट्रास घातकारक असा जो रणसंग्राम झाला होता त्याचें मुख्य बीज रोहिले जातीचा सरदार नजीबउद्दौला हाच होता, सबब वर लिहिलेल्या मराठे सरदारांनीं त्याचा मुलुक म्हणजे रोहिलखंड याजवर चढाई करून त्याची धूळधाणी केली, आणि रोहिलेलोकांस पादाक्रांत करून त्यांस जीवरक्षणार्थ कमाऊं पाहाडांत पळून जाणें भाग पाडिलें. नंतर

त्या सरदारांनीं दिल्लींत पेशव्यांचा अंमल केला, आणि मोघल बादशाहास इंग्रजांचे आश्रयांतून काढून आपले आश्रयाखालीं घेतलें. अशाच प्रकारचीं कित्येक राज्य कारणें व उलाढाल्या त्या प्रांतीं झाल्या; त्यांचा विस्तार स्थलसंकोचास्तव येथें लिहिणें जरूर दिसत नाहीं. इतकेंच लिहिणें बस्स आहे कीं, पुढें दोन अडीच वर्षांनीं रणशूर, मसलती, न्यायी, जर्बी असून लोक प्रीय, व राजकार्यधुरंधर असे जे माधवरावसाहेब पेशवे ते संपूर्ण मराठे राष्ट्राचे कमनशीबामुळें अल्पवयांतच पुण्यानजीक थेऊर नांवाच्या गणेश क्षेत्रांत गणपतीसंनिध परलोकवासी झाल्यानंतर, बिनीवाले विसाजी कृष्ण हे पुण्यास परत आले; परंतु माहादजी शिंदे व शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांस बंदोबस्ताकरितां तिकडेसच राहणें प्राप्त झालें.

हिकडे पुण्यांत असें झालें कीं, माधवरावसाहेबांचा देहांत झाल्यावर त्यांचे कनिष्ठबंधू नारायणराव यानीं साताऱ्यास जाऊन तेथील रामराजे यांजपासून मुख्य प्रधानाच्या अधिकाराचीं वस्त्रें घेतलीं; आणि थोडीं वर्षें राज्य चालविल्या नंतर ते सन १७७३ सालीं मारेकऱ्यांच्या हातांनीं मारले गेले. त्यावेळेस त्यांची पत्नी गंगाबाई ही कांहीं महिन्यांची गरोदर असून तिला पुढें पुत्र झाला: आणि कारभारीमंडळानें त्याचें नांव माधवराव असें ठेवून त्यांच्या नांवानें राज्यकारभार चालू केला. त्या कारभाऱ्यां पैकीं नानाफडनवीस यानीं उत्तरोत्तर सखारामबापू बोकील, मोरोबादादा फडनवीस, वगैरे मुत्सद्दी मंडळीवर आपले वर्चस्व स्थापून संपूर्ण राज्यकारभाराचीं सूत्रें आपले हातांत घेतलीं.

तिकडे उत्तरहिंदुस्थानांत सन १७८३ इसवी सालीं माहादजी शिंदे यानीं दिल्लीचे बादशाहाची फौज बरोबर घेऊन जयपूरचे राजावर स्वारी केली. तेव्हां जयपूरचे व जोधपूरचे राजे यांचा एकोपा होऊन त्यानीं शिंदे यांचे फौजेबरोबर ल-

ढाई केली; तींत बादशाही फौजेपैकीं महमदबेग व इस्मायलबेग या नांवांचे दोन मुसलमान सरदार आपापल्या हाताखालच्या फौजेनिशीं शिंद्यांचें लष्कर सोडून गेले आणि जयपूरचे फौजेंत मिळून उलटे शिंद्यांचे फौजेबरोबर लढूं लागले; त्यामुळें शिंद्यांचा पक्ष दुर्बळ झाला. तत्रापि त्यांजजवळ कवाइती फौज होती; तिजवरील फ्रेंच सरदार यांनीं लढाई न सोडितां गोळ्यांचा वर्षाव चालविलाच होता. त्यामुळें जयपूरचे सैन्यांतील बहुत लोक जखमी झाले व पडले. तें पाहून वर लिहिलेल्या दोन फितुरी सरदारांनीं शिंद्याच्या तोफा हिसकावून घ्याव्या या इरायानें मोठ्या निकरानें एकदम हल्ला केला. त्याचा परिणाम इतकाच झाला कीं, कवाइती फौजेस मागून पाठिंबा नसल्यामुळें ते सरदार गोल बांधून निघून गेले आणि बाकीच्या बेकवाइती फौजेवरच सर्व मारा पडला. अशा बिकट प्रसंगीं आपला बचाव कसा होईल याविषयीं माहादजी शिंदे यांस फिकीर प्राप्त झाली; आणि पुढें काय करावें या विवंचनेंत ते असतां, त्यांचे मनांत शिवाजी विठ्ठल यांची मदत मागावी असा विचार आला. परंतु त्या वेळेस पुण्याचे दरबारांत मुख्य दिवाण नाना फडणवीस होते; त्यांचे मनांत माहादजी शिंदे यांचा अधिकार मर्यादित राहावा, व जयपूर वगैरे रजपूत राजांवर दाब राहणें तो माहादजी शिंदे यांचे विद्यमानें न राहातां परभारें राहावा असें असून, त्याविषयीं त्यानीं शिवाजी विठ्ठल यांस आंतून सूचनाही केली होती. त्यामुळें शिवाजी विठ्ठल हरवक्त माहादजी शिंदे यांचे स्वारीशिकारींत सामील न होतां,अलग राहत असत. तशांत थोडके दिवसांपूर्वी त्यांजविषयीं शिवाजी विठ्ठल यांचें मन विटण्यास एक कारण झालें होतें. तें असें:—

शिंद्यांचे लष्करांत गोसावी लोकांचा बहुत भरणा असून त्या सर्व लोकांवर हिंम्मतबाहादर या खिताबाचा एक गोसावी सरदार होता. त्यावर मगरूरीचे कारणास्तव शिंद्यांची इतराजी होऊन

त्यांनीं त्यास कैद करण्याचा हुकूम केला. हें वर्तमान हिंम्मतबाहादर यास कळतांच तो तावडतोब आपले गोटांतून निघाला आणि शिवाजी विठ्ठल यांचे गोटांत येऊन जरीपटक्याचे आश्रयाखालीं बसला. तें ऐकून शिंदे यानीं वकिलाबरोबर शिवाजी विठ्ठल यांस सांगून पाठविलें कीं, "हिंमतबाहादर यास आमचे स्वाधीन करावें." त्याचें उत्तर शिवाजी विठ्ठल यानीं असें सांगून पाठविलें कीं, "जरीपटका हें चिन्ह माझें खासगी नसून आपले सर्वांचे मालिक पेशवे बाहादर यांचे मरातबाचें आहे; त्याचा हिंम्मतबाहदरानें आश्रय केला असतां, त्यास पकडणे हें त्या झेंडयाचा अपमान केल्याप्रमाणें होईल, सबब ती गोष्ट माझे हातून होणार नाहीं; व तसें तुम्हींहि न करावें अशी तुह्मांस माझी सल्ला आहे; कारण कदाचित् मीं त्यास धरण्याचा यत्न केलाच तर त्या झेंडयाचें रक्षण करणारे लोक तो मालिकास शरण आला आहे असें समजून त्यास माझे सुद्धां स्वाधीन करणार नाहींत. आणि या माझे सूचनेविरुद्ध तुम्हीं त्यास पकडण्याचा यत्न कराल तर ही गोष्ट आपले मालिकांपर्यंत पोंहोचेल, आणि शेवटीं काय परिणाम होईल हें माझ्यानें सांगवत नाहीं. याकरितां जें करणें असेल तें विचारकरून करावें." हें ऐकून माहादजीबाबांस राग आला. तेव्हां त्यांचा राणेखान् नांवाचा एक सरदार जवळ होता; त्यास असें वाटलें कीं, शिंदे रागाच्या सपाटयांत कदाचित् कांहीं अविचाराची गोष्ट करतील. त्यावरून त्यानें त्यांस विनंती केली कीं, "खुदावंद! आपण या कामीं आग्रह धरणें हें ठीक नाहीं; कारण ही गोष्ट खचीतच लांबून आपले मालिक पेशवे यांजपर्यंत जाणार आहे; व आपण ज्या स्थितींत हाल्लीं आहों त्या स्थितींत आपसांत तंटा उत्पन्न करून आपला पक्ष दुर्बळ करणें हें रास्त नाहीं." शिंदे हेही विचारीच होते; त्यांस जरी राग आला होता, तरी त्यानीं तो पिऊन जाऊन पुढें वरील गोष्टीचे संबंधानें कांहींच तजवीज केली नाहीं. तत्रापि त्यावेळेपासून शिवाजी विठ्ठल व माहा-

दजीबावा यांचीं मनें कांहीं काळपर्यंत शुद्ध राहिलीं नाहींत. असो; हिंम्मतबाहादर यास वर लिहिल्याप्रमाणें आश्रय मिळाल्यानें तो शिवाजी विठ्ठल यांचे लष्करांतच राहिला.

सदर्हु कारणास्तव शिवाजी विठ्ठल हे वर लिहिलेल्या लढाईंत सामील न होता आपल्या हाताखालच्या फौजेनिशीं थोडक्याच अंतरावर लढाईचे तयारीनें काय परिणाम होतो त्याची वाट पाहात उभे राहिले होते.

परस्परांचीं मनें शुद्ध नव्हतीं या कारणास्तव शिवाजी विठ्ठल यांस मदतीसाठीं सूचना करावी किंवा नाहीं याविषयीं शिंदे हे मनांत विचार करीत होते. शेवटीं दुसरा इलाजच नसल्यामुळें त्यानीं त्यांस असें सांगून पाठविलें कीं, "या संकटसमयीं मनांतील सर्व गोष्टी एकीकडे ठेवून तुम्हीं मला मदत केली असतां फौजेचा नक्षा राहील; नाहीं तर आपले मालिकाचे कीर्तीस कलंक लागणार आहे."

शिवाजी विठ्ठल मदतीस येण्यापूर्वींच शिंद्यांचे फौजेचा मोड होऊन जयपूरचे राजाकडील केसरिया लोक* त्या फौजेचा पाठलाग करीत चालले होते. ते समयीं, ज्याप्रमाणें आपले वडिलानीं पूर्वीं लढाया मारून आपले मालिकाचा नक्षा केला होता, त्याचप्रमाणें आपणही लढाई मारून नक्षा करण्याची हीच वेळ आहे असें शिवाजी विठ्ठल यांस वाटून त्यानीं आपले फौजेनिशीं उठावणी केली; आणि जयपूरचे केशरीया लोकांवर हल्ला करून त्यांचा अगदीं मोड केला; व त्यांची कत्तल उडवून त्यांस पळवून लाविलें; आणि जे केशरिया लोक अगोदर मोठ्या फुशारकीनें

---

*जे रजपूत शिपाई लोक लढाईस निघण्याचेपूर्वीं आपले घरची सर्व निरवानिरव करून, नंतर आफिमेचा कुसुंबा पिऊन शत्रूस मारूं अगर मरूं अशा दृढ निश्चयानें केशरी पाषाग करून लढाईस जातात, त्यांस केशरीया हें नांव आहे.

शिंद्यांचे फौजेचा पाठलाग करीत चालले होते त्यांचाच पाठलाग आपण करून त्यांस जयपूर शहरापर्यंत मारीत नेलें. या लढाईंत शिवाजी विठ्ठल यांचे फौजेवरील सेनापती बाबूराव विठ्ठल कोटमगांवकर, दिवाण चिमणाजी खंडेराव व मेवाती लोकांचे जमातीचा मुख्य सरदार यांनीं मोठी बाहादुरी करून पूर्णपणें जय मिळविला. तेणेंकरून माहादजी शिंदे यांचे फौजेचा नाशापासून बचाव होऊन ते विंचूरकर यांचे मोठे आभारी झाले. त्या रात्रीस माहादजी शिंदे यानीं स्वतः शिवाजी विठ्ठल यांचे डेऱ्यांत जाऊन त्यांचे बहुत उपकार मानिले, आणि त्या वेळेस जें समजुतीचें भाषण झालें तेणेंकरून उभय सरदारांमध्यें पुर्वीं आलेलें वैमनस्य नाहींसें होऊन पुनः सख्य झालें. त्या वेळेपासून शिंदे हे शिवाजी विठ्ठल यांस काका असें म्हणूं लागले. सदर्हू उपकारापासून उतराई होण्यास्तव माहादजी शिंदे यानीं आपले मुलुकापैकीं फत्तेआबाद माहाल शिवाजी विठ्ठल यांस देऊन त्याबद्दल त्यांस सनद करून दिली. सदर्हू माहाल विंचूरकर यांजकडे कांहीं वर्षें शिंद्यानीं चालविला. आपल्या मनाची सफाई झाल्याचें एक चिन्ह म्हणून शिवाजी विठ्ठल यानींहि हिंम्मतबाहादर गोसावी यास बोलाविलें, आणि त्यास माहादजी शिंदे यांचे स्वाधीन करून त्याचे अपराध क्षमा करण्याविषयीं त्यांस सिफारिष केली. माहादजी शिंदे यानीं त्या सिफारिषीचा स्वीकार करून हिंम्मतबाहादर यांस आपलेबरोबर नेलें. नंतर शिवाजी विठ्ठल यानीं आपले फौजेंतील मेवाती लोकांचा जमादार यास वर लिहिलेल्या बाहादुरीबद्दल बक्षिस म्हणून आपले भीतरवार नांवाचे माहालापैकीं सालिना ३०० रुपये आकाराची जमीन दिली. तिचा उपभोग त्या जमादाराचे वंशज अद्यापि करीत असून त्यांपैकीं एक इसम विंचूर संस्थानांत नोकरी करीत असतो.

पुढें बुंदी व कोटा वगैरे ठिकाणचे रजपूत राजांवर शिंदे यानीं ज्या स्वाऱ्या केल्या, त्या सर्वांत शिवाजी विठ्ठल

हे त्यांजबरोबर फौजेनिशीं असून त्यांची त्यास लढाईंत मोठी मदत असे. आणि बुंदी व कोटा येथील राजांकडून ज्या खंडण्या शिंदे यांस देण्याचे ठराव झाले, त्या खंडण्यांपैकीं शिवाजी विठ्ठल यानीं आपला हिस्सा पृथक ठरवून घेतला; तो त्यांचे घराण्यास पेशवाईचे आखेरीपर्यंत मिळत होता. सदहूप्रमाणें त्यांनीं पृथक ठराव करून घेतल्यानें नानाफडणवीस यांस मोठा संतोष झाला.

पुढें थोडक्याच दिवसांनीं असें झालें कीं गुलामकादर नांवाच्या ज्या रोहिले सरदारानें आलमगीर बादशाहा यास कैद करून त्याचे फार हाल केल्यानंतर त्याचे डोळे काढून टाकिले होते,त्या सरदाराचें पारिपत्य करण्याकरितां शिंदे यानीं त्याजवर स्वारी केली. त्या स्वारींत, व तसेंच पुढच्याही लढायांत, शिवाजी विठ्ठल हे फारशी मेहनत न करितां अलग राहिले; कारण शिंदे यांचा प्रताप फारच वाढत चालल्यामुळें त्यांस नानाफडणवीस यांजकडून वरचेवर गुप्त सूचना येत असत कीं, "तुम्हीं शिंदे यांस लढाईचे कामीं विशेष मदत न करितां, त्यांच्या सर्व राजकारणांत व मोहिमांत आपण सामील आहों इतकें मात्र बाह्यात्कारीं लोकांस दिसेल असें वागावें." सदहू लढायांत माहादजी शिंदे यानीं गुलामकादर यास कैद करून त्यानें पूर्वीं बादशाहाचे डोळे काढिले होते त्याचा सूड उगविण्याकारितां, त्याचे डोळे काढविले; आणि मोठे हाल करून शेवटीं त्यास मारून टाकिलें; व त्याचें साह्य करणाऱ्यांचाही अगदीं मोड करून त्यांस मुलकांतून हाकून दिलें. याप्रमाणें शिंदे यांची चोहोंकडे उत्तर हिंदुस्थानांत जरब बसली. नंतर शिंदे दिल्लीस परत येऊन त्यानीं आलमगीर बादशाहास पुनः समारंभानें तखतावर बसविलें, आणि त्याचे हुकूमावरून, त्याचा पुत्र बेदरबखत, जो पूर्वीं गुलाम कादर यास मिळून त्याचे वतीनें बादशाहाचे तख्तावर बसला होता, त्यास मारून टाकिलें. याप्रमाणें माहादजी शिंदे यानीं दिल्लीचे बादशाहाचे फारच उपयोगीं पडून त्यास संकटांतून मुक्त केलें, यामुळें तो मोठा आभारी होऊन शिंद्यांवर

त्याची कमाल मेहरबानगी झाली. तेव्हां शिंदे यानीं प्रथम त्याजपाशीं हिंदुस्थानांत गोवध बंद होण्याची सनद मागितली. ती त्यांस लागलीच प्राप्त झाली. नंतर त्यानें शिंदे यांस व त्यांचे विनंतीवरून त्यांचे मालिक पेशवे यांस मोठे खिताब, हक्क व बक्षिसें दिलीं आणि त्याबद्दल सन १७९३ इसवी सालीं त्यांस निरनिराळ्या सनदा करून दिल्या.* त्याचप्रमाणें त्यानें शिवाजी विठ्ठल यांसही एक तरवार, एक खंजीर व पुष्कळ जवाहीर बक्षीस दिलें; आणि पूर्वी त्यांचे वडील विठ्ठल शिवदेव यांस राजे उमदे-उल्मुलक बाहादर असा खिताब देण्यांत आला होता तो त्यांचे वंशजांस कायम केला.

शिवाजी विठ्ठल उत्तर हिंदुस्थानांत वीस बावीस वर्षें होते. प्रथम त्यांचे स्वारीचा मुक्काम बहुधा ग्वाल्हेर येथें असे; परंतु सन १७७९ चे सुमारास शिंदे यांचे मनांत असें आलें कीं, आपणांस ज्या मुलुकांवर स्वाऱ्या करावयाच्या त्यामुलकांस ग्वाल्हेर हें ठिकाण नजीक असून तें छावणीस फार सोईचें आहे; तसेंच तेथें व त्याचे आसपासचे प्रदेशांत हवापाण्याचीही सोय चांगली आहे. याकरितां "तें शहर शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांजकडून आमचे स्वाधीन करविलें असतां माझे फौजेची मोठी सोय होईल," असें माहादजी शिंदे यानीं पुण्याचे दरबारास लिहून पाठविलें. त्यावरून ग्वाल्हेर शहर व तो किल्ला आणि त्याचे बंदोबस्ताचे खर्चासाठीं लावून दिलेला मुलुक येणेंप्रमाणें माहादजी शिंदे यांचे स्वाधीन करून देण्याविषयीं शिवाजी विठ्ठल यांस पुण्याहून दरबारचा हुकूम गेला. तेव्हां त्यानीं हुकुमाप्रमाणें व्यवस्था केली, आणि आपलें लष्कर तेथून काढून मथुरा येथें त्याची छावणी केली. ग्वाल्हेर हें ठिकाण शिवाजी विठ्ठल यांचे वडील विठ्ठल शिवदेव यानीं जाटापासून मोठ्या शौर्यानें सर केलेलें असून तेथें

---

* या संबंधाचे कागद या इतिहासाचें परिशिष्ट "क" यांत दाखल केले आहेत.

त्यांचें लष्कर राहाण्याचीही सोय चांगली होती; आणि तें माहादजी शिंदे यांस देवविल्यानें आपले हक्कांत कमीपणा आला असें शिवाजी विठ्ठल यांस वाटल्यावरून त्यानीं पुण्यास गेल्यावर त्या बाबतींत श्रीमंतांस विनंती करण्याचा निश्चय केला; परंतु त्याविषयीं पुढें काय झालें तें समजत नाहीं. शिवाजी विठ्ठल पुण्यास येण्यास निघाले त्यावेळेस शिंद्यानीं त्यास सांगितलें कीं "तुमची फौज आमचे मदतीस बहुत वर्षे आहे. आतां तुह्मी देशीं जाणार याकरितां तुमची एक पागा आमचे हुजूर हमेषा असावी अशी आमची इच्छा आहे." त्यावरून शिवाजी विठ्ठल यानीं शंभर स्वारांची एक पागा शिंदे यांचे तैनातीस ठेविली. ती पागा प्रस्तुतचे राज्यकर्ते माहाराज जयाजीराव शिंदे यांचे कारकिर्दीचे आरंभापर्यंत शिंद्यांकडे होती. शिवाजी विठ्ठल यानीं ग्वाल्हेर येथें एक मोठा वाडा बांधिला होता; त्यांत विंचूरकरांचे हिंदुस्थानांतील माहालांचें कामकाज चालत होतें; व त्या संबंधानें शिंद्यांचे हुजूर एक वकीलही होता; तो तेथें राहून पागा व माहाल या दोहींचीं कामें पाहात असे. पुढें दक्षिणेंत इंग्रजी अंमल होऊन विंचूरकरांचे तिकडील सर्व माहाल इंग्रज सरकारांकडून खालसा होततोंपर्यंत त्यांचा वर लिहिल्याप्रमाणें एक वकील तेथें राहिला. तेथील शेवटचा वकील गणेश राजाराम या नांवाचा मनुष्य होता.

सन १७९३ इसवी सालीं माहादजी शिंदे पुण्यास आले तेव्हां शिवाजी विठ्ठलही त्यांजबरोबर पुण्यास आले. त्या वेळेस त्यांचें वय पासष्ट वर्षांवर होतें. नंतर दिवसेंदिवस त्यांचें शरीर अशक्त होत जाऊन पुढें सुमारें दीड वर्षानें त्यांची प्रकृति फार बिघडली. तेव्हां त्यांचे कारभारी व पदरची इतर मंडळी यांनीं त्यांचे कनिष्ट बंधूचे पुत्र नरसिंह खंडेराव यांस दत्तक घेण्याविषयीं त्यांस अग्रह केला; आणि माधवराव नारायण पेशवे हे नाना फडणवीस वगैरे मुत्सद्दी मंडळीसह त्यांचे समाचारास गेले

असतां त्यांनींही तें दत्तविधान करावें असें सांगितलें. तथापि खंडेराव विठ्ठल यांवर शिवाजी विठ्ठल यांचा अत्यंत लोभ होता म्हणून खंडेराव यांस नरसिंहराव जो एकटाच पुत्र होता तो आपण दत्तक घेऊन त्यांचा स्वतःचा वंश खुंटविणें हें आपणास प्रशस्त नाहीं असें शिवाजी विठ्ठल यांस वाटल्यावरून त्यानीं त्या बाबदींत श्रीमंतांस विनंती केली कीं, " खंडेराव विठ्ठल यांनीं सरकारची पुष्कळ नौकरी केली असून ते सरदारीस योग्य ही आहेत व त्यांस सरदारी मिळावी अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे; हें मालीकांनीं मनांत आणून माझे पश्चात् त्यांसच सरदारीचीं वस्त्रें द्यावीं. तेही वडिलांचे नांवाप्रमाणें सरकारचे सेवेंत तत्पर राहून ती इमानानें करितील. " ही विनंती पेशवे व नानाफडणवीस यानीं कबूल केली; आणि त्यांस सांगितलें कीं, " तुमचे इच्छे-प्रमाणें होण्यास सरकारची बिलकूल हरकत नाहीं; खंडेराव यांस सरदारीचीं वस्त्रें देण्यांत येतील. " याप्रमाणें शिवाजी विठ्ठल यांनीं आपले पश्चात् आपली सरदारी चालविण्याची व्यवस्था लाविल्यावर, पदरचे सर्व कामगारांस बोलावून त्यांस खंडेरावांचे आज्ञेप्रमाणें वागण्याविषयीं उपदेश केला. नंतर श्रावण शुद्ध २ सन १७९४ इसवी (शके १७१५) सालीं त्यांस देवाज्ञा झाली.

शिवाजी विठ्ठल यांस तीन स्त्रिया होत्या. पैकीं ज्येष्ठ स्त्रीस "माईसाहेब" असें म्हणत असत. विठ्ठल शिवदेव जिवंत असतांच त्या बाईचे पोटीं त्यांस दोन पुत्र झाले होते. त्यांपैकीं ज्येष्ठ पुत्राचें नांव अमृतराव असें होतें. परंतु दुर्दैवेंकरून ते ग्वाल्हेरीस असतांच कनिष्ठ पुत्र गणपतराव हे परलोकवासी होऊन त्यांची स्त्री त्यांजबरोबर सती गेली होती. शिवाजी विठ्ठल यानीं गणपतराव यांचे नांवानें ग्वाल्हेर येथें एक बागेंत गणपतीचें मंदीर बांधून त्या देवाचे पूजानैवेद्यासाठीं ग्वाल्हेरगिर्दीतून दररोज एक रुपयाप्रमाणें नेमणूक करून दिली, ती अद्यापि चालत आहे. शिवाय त्यानीं सुवर्णरेखा नदीचे कांठीं, जेथें गणपतराव यांजबरोबर त्यांची

पत्नी सती गेली होती तेथें एक मोठें वृंदावन बांधिलें, तें अद्याप-पर्यंत कायम आहे. शिवाजी विठ्ठल यांचे दुसरे चिरंजीव अमृतराव हे वयांत येऊन योग्यतेस चढले होते; परंतु क्षेत्र मथुरा येथें त्यांस देवाज्ञा होऊन त्यांचीही स्त्री त्यांजबरोबर सती गेली. त्या ठिकाणीं शिवाजी विठ्ठल यानीं एक भव्य शिवालय बांधिलें आहे; व यमुनातीरीं ज्या ठिकाणीं पूर्वीं त्रेतायुगांत ध्रुवानें तपश्चर्या केली, त्या ठिकाणीं घाट बांधिला आहे. त्यास ध्रुवघाट असें म्हणतात.

शिवाजी विठ्ठल यांची वर लिहिलेली वडील स्त्री माईसाहेब त्यांजबरोबर हिंदुस्थानांतून दक्षिणेंत आली, त्या वेळेस ती पुत्र-वियोगामुळें अत्यंत दुःखी होती; सबब ती विंचुरास न येतां गोदातीरीं सायखेडें येथें राहिली; आणि ती तेथें उत्तम प्रकारें दान-धर्म करीत असतां तिचा देहांत झाला.

शिवाजी विठ्ठल यांची दुसरी स्त्री उमाबाई हिला दोन कन्या झाल्यावर तीस देवाज्ञा झाली. त्या दोन कन्यांपैकीं एकीचें नांव बहिणाबाई; तीस शिवाजी विठ्ठल यानीं देवासकर पवाराचे कार-भारी सुपेकर यांचे घरीं दिली, व आपले पाटोदे माहालांतील जात सरं-जामाचे गांवांपैकीं धुळगांव जो निम्मे जहागीर होता तो सुपेकरांस इनाम देऊन बाकी निम्मे गांव सरकारखालसा होता तोही त्या इनामास जोडण्याविषयीं पेशवेसरकारांस विनंति केली. ती पेशव्यांनीं कबूल करून एकंदर संपूर्ण गांवाची सनद सुपेकर यांस दिली. सदर्हू गांवाचें वार्षिक उत्पन्न हल्लीं लोकलफंड खु-द्दां १४६७ रुपये आहे. सदर्हू इनामी गांवाचा उपभोग हल्लीं बहिणाबाईचा वंश करीत आहे. दुसरी कन्या साळूबाई ही नगर जि-ल्ह्यांतील शेवगांव तालुक्याचे देशपांडे यांचे येथें दिली होती. त्या बा-ईस एक कन्या झाल्यानंतर देवाज्ञा झाली. ती कन्या अहिल्याबाई साहेब होळकर यांचे खासगी कारभारी खंडो बाबूराव यांचे येथें

दिली होती. त्या बाईचे वंशज नगर जिल्ह्यांत प्रवरा नदीचे कांठीं आकोलें येथें असून त्यांस विंचूर संस्थानांतून नेमणूक व इनाम मिळालें, तें अद्यापि त्यांजकडे चालत आहे.

शिवाजी विठ्ठल यांचे कनिष्ठ पत्नीस ताईसाहेब असें म्हणत असत. त्या बाईस संतति झाली नाहीं. पुढें ती शिवाजी विठ्ठल यांजबरोबर सती गेली.

शिवाजी विठ्ठल यानीं आपल्या आयुष्यांत धर्मकृत्यें केलीं तीं येणें प्रमाणें:—

त्यानीं प्रयाग येथें यमुनेचे पलीकडे सोमेश्वराचे देवालयानजीक वेणीमाधवाचें मंदीर बांधिलें. तें कोणत्या शकांत व कोणत्या महिन्यांत व कोणी बांधिलें याविषयीं त्याजवर लेख आहे. ह्या देवाचे पूजेबद्दल शिवाजी विठ्ठल यानीं आपले फत्तेआबाद माहालांतून एका कनोजिया ब्राम्हणाचे नांवानें सालिना रुपये १०० ची नेमणूक करून दिली. ती अद्यापि चालत आहे.

क्षेत्र मथुरा येथें वृंदावनांत कुंज आहे. तेथें शिवाजी विठ्ठल यानीं राधामाधवाचें एक मंदीर बांधून, त्याचे लगत एक वाडाही बांधिला आहे. त्या मंदिरांतील मूर्तीचे पूजेबद्दल त्यानीं आपले भीतरवार माहालांतून नेमणूक करून दिली. ती हाल्लीं चालत आहे. त्यानीं मथुरेनजीक एक बाग केला होता तो अद्यापि विंचूरकरांचे कबज्यांत आहे.

नरसिंहपूर येथें विठ्ठल शिवदेव यानीं श्रीनरसिंहाचे देवालयांतील गाभारा बांधिला होता. त्यालगत शिवाजी विठ्ठल यानीं एक मोठा दगडी सभामंडप व पश्चिमेकडील माहाद्वार व त्यावरील नगारखाना हीं कामें पुष्कळ खर्चानें बांधिलीं.

त्यानीं सायखेडें येथें गोदातीरीं एक शिवालय बांधिलें. तें अद्यापि कायम् आहे.

निफाड तालुक्यांत नांदुरानजीक गोदेचे दक्षिणतीरीं ठाणगांवचे हद्दींत त्यानीं गणपतीचें एक मोठें देवालय बांधिलें असून त्याचे पूजेअर्चेबद्दल एक इनाम जमीन दिली. ती अद्यापि चालत आहे

श्रीक्षेत्र काशी येथें त्यानीं भोंसल्यांचें घाटाचे पाठीमागें एक राममंदीर बांधिलें असून त्यास ग्वाल्हेरगिर्दीतून नेमणूक करून दिली. ती अद्यापि चालत आहे; व क्षेत्रमजकुरींच दुर्गाघाटावर एक वाडा बांधिला, तोही अद्यापपर्यंत कायम आहे.

त्यानीं त्रिस्थळी यात्रा मोठ्या खर्चानें केली. त्या वेळेस प्रयागवळ, काशीचे गंगापुत्र व गयेचे गयावळ हे यात्रेकरू लोकांस फार अडवून स्वारी खर्चाची बाब ह्मणून मनास मानेल तसा पैसा घेत होते; परंतु यात्रेकरू लोकांस तशा प्रकारें छळणें हें गैरवाजवी आहे असें शिवाजी विठ्ठल यानीं पाहून, स्वारीबाबेबद्दल प्रत्येक मनुष्यापासून पंधरा रुपयांहून जास्ती घेऊं नये असा नेम करून दिला; त्याप्रमाणें बहुत दिवस वहिवाट चालत होती.

मथुरेनजीक एक सिद्ध पुरुष होते, त्यांस लोक अजगरबावा असें ह्मणत असत. शिवाजी विठ्ठल व त्यांची स्त्री माईसाहेब या उभयतांनीं पुष्कळ दिवस त्यांची सेवा केली आणि पुढें त्यांस आपले छावणींत आणून तेथेंही त्याचप्रमाणें कांहीं वर्षेपर्यंत सेवा केली. पुढें शिवाजी विठ्ठल यांचे कनिष्ठ चिरंजीव अमृतराव हे दक्षिणेंत येऊं लागले त्या वेळेस त्यानीं त्या सिद्ध पुरुषास अंबारींत बसवून येथील नाशिक पंचवटीस आणिलें; आणि तेथें त्यांची उत्तम प्रकारें बरदास्त ठेवून कांहीं दिवस पर्यंत स्वतः त्यांची सेवा केली. त्यांचे सिद्धत्वाविषयीं नाशिक येथें लोकांत असें वर्णन आहे कीं, एके समयीं ते धुनीजवळ पडलेले असतां, धुनीवरील लांकडें पेटून त्यांचे पायाचा कांहीं भाग जळून गेला, तरी त्यानीं बिलकुल चळवळ केली नाहीं. त्या जळण्याची दुर्गंधी जेव्हां

बाहेर गेली तेव्हां ती कोठून येत्ये याचा तपास करीत करीत लोक मठांत शिरले; तों त्या सिद्ध पुरुषाचा पाय जळतांना त्यांचे दृष्टीस पडला. तेव्हां त्यानीं पेटलेला अग्नि एकीकडे केला, आणि त्या जळलेल्या पायास औषधोपचार करून तो बरा केला. पुढें कांहीं वर्षांनीं तो सिद्ध पुरुष समाधिस्थ झाल्यावर अमृतराव यानीं त्याची पुष्कळ खर्चानें समाधि बांधिली, आणि तिजवर देवालय बांधून त्यांत एक लिंग स्थापन केलें. त्या शिवालयाबाहेरील दरवाज्यावर एक शिलालेख स्थपन केलेला आहे, तो येणेंप्रमाणें:—

"श्री लक्ष्मीनृसिंहचरणीं तत्पर अमृतराव शिवदेव उमदे तुल्मुल्क बाहादर विंचूरकर शके १७१० "

शिवाजी विठ्ठल यानीं विंचूर येथें राहाते वाडयासमूर दगडाचें एक मोठें शिवालय बांधून त्यांत ओंकारेश्वर नांवाचें शिवलिंग स्थापन केलें; तसेंच गांवाबाहेर नदीतीरीं दगडाचें एक शिवमंदीर बांधून त्यांत पातालेश्वर नांवाचें शिवलिंग स्थापन केलें. हीं देवालयें कायम आहेत. या खेरीज त्यानीं गांवा सन्निध राममंदीर व गांवांत मारुतीचें मंदीर अशीं देवालयें बांधिलीं तीं लांकडीं आहेत. या देवांच्या पूजानैवेद्याचा खर्च विंचूर संस्थानांतून चालतो. त्यांस स्वतंत्र नेमणुका नाहींत.

खासगी जहागिरींत विंचुरापासून दीड कोसावर कोटमगांव म्हणून एक गांव आहे. तेथें बहुत प्राचीन असें मारुतीचें मोठें जागृत स्थान आहे. त्यास रोकडोबा असें म्हणतात. शिवाजी विठ्ठल यानीं त्या देवाचें मोठें लांकडी मंदीर बांधून त्याची पूजा व नैवेद्य यांचाही बंदोबस्त केला. तो अद्यापपर्यंत चालत आहे.

पाटोदें माहालांत खुद्द पाटोदें येथें रामेश्वर नांवाचें शिवस्थान आहे. त्याजवर मोठें मंदीर बांधिलेलें आहे. त्या देवाचे पूजानैवेद्याबद्दल त्यानीं जमीन दिली, ती अद्यापि चालत आहे.

शिवाजी विठ्ठल यांस आपस्माराची व्यथा होती. त्याबद्दल त्यानीं पुष्कळ उपचार केले; परंतु कांहीं उपयोग होईना. शेवटीं त्यांस अजगरबावानीं असें सांगितलें कीं, "एक लक्ष शालिग्राम ब्राम्हणांस दान करावे, म्हणजे ही व्यथा दूर होईल." त्याप्रमाणें शिवाजी विठ्ठल यानीं लक्ष शालिग्राम दान केल्यावर त्यांचा तो दुर्धर रोग अगदीं गेला.

शिवाजी विठ्ठल यानीं नानाप्रकारच्या शालिग्रामशिला, बाण, गंडकीशिलेच्या व धातूंच्या नानाप्रकारच्या देवांच्या मूर्ती, त्याचप्रमाणें नानाप्रकारचे संस्कृत ग्रंथ यांचा बहुत द्रव्य खर्च करून संग्रह केला होता; त्यापैकीं अगदीं थोडा भाग आतां विंचूर संस्थानांत कायम राहिला आहे.

गोदातीरीं मौजे सायखेडें येथें शिवाजी विठ्ठल यानीं पुष्कळ घरें बांधून तीं ब्राम्हणांस दान केलीं; आणि त्या भागास ब्राम्हपुरी असें नांव दिलें. तसेंच आपले सरंजामापैकीं उरपाड माहालांतून त्या ब्राम्हणांचे निर्वाहार्थ वर्षासनें करून दिलीं. तीं पेशवाईअखेरपर्यंत निर्वेध चाललीं. पुढें इंग्रजी अंमल होऊन इंग्रजांनीं उरपाड माहाल खालसा केल्यावर त्यानीं तीं सर्व वर्षासनें ताहयात केलीं. त्यामुळें तीं आतां बुडाल्यासारखींच झालीं आहेत. शिवाय, त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत कितीएक लोकांस आग्रहार व जमिनी दिल्या; त्या अद्यापपर्यंत चालत आहेत. येवलें येथें श्री बालाजीचें संस्थान बहुत प्राचीन आहे. त्या संस्थानाचे पुजारी बहुत योग्य होते. त्या बालाजी देवाची पूजा व नैवेद्य हीं व्यवस्थित रीतीनें चालावीं म्हणून शिवाजी विठ्ठल यानीं आपले जाहागिरींतील पाटोदें माहालपैकीं मौजे न्याहारखेडें हें गांव त्या देवाच्या नांवानें करून दिलें. त्याचा आकार रुपये ६७ आहे. त्या खेड्याची वहिवाट हाल्लीं देवाचे पुजारी करीत असून त्याचे उत्पन्नाचा व्यय त्या देवाकडे करीत आहेत.

शिवाजी विठ्ठल यानीं आपले जातसरंजामांतील येवलें गांवाच्या पेठेंत एक टंकसाळ स्थापून नाणें पाडणें सुरू केलें. त्या रुपयावर तुळसीच्या झाडाचें चिन्ह असून त्यास "नरसिंह शिक्का" असें लोक ह्मणत असत. ही टंकसाळ दक्षिणेंत इंग्रजी अंमल होईतोंपर्यंत चालली.

शिवाजी विठ्ठल यांच्या स्वरूपाचें व स्वभावाचें वर्णन.

शिवाजी विठ्ठल यांचा रंग काळसर असून त्यांचे शरीराची काठी ठेंगणी होती. ते स्वभावानें शांत, उदार व दयाळु असे होते पण शूरत्वांत कमी नव्हते.

खंडेराव विठ्ठल यांचें चरित्र.

मागील चरित्राचे अंतीं आम्हीं शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांचे देहांतासंबंधी मजकूर लिहिला. आतां त्यांचे कनिष्ठ बंधु खंडेराव विठ्ठल यांचें चरित्र लिहिण्यास आम्ही आरंभ करितों.

शिवाजी विठ्ठल यांचे मरणानें त्यांचे आप्तवर्ग, इष्टमित्र आणि पदरची मंडळी यांस दुःख झालें हें सहजीक आहे; परंतु त्यांचे कनिष्ठ बंधु खंडेराव यांजवर त्यांचा अतिशय लोभ असून उभयतां बंधु एकमेकांचा मोठा मान ठेवीत असत, यामुळें खंडेराव यांस जें दुःख झालें तें अनिर्वाच्य होतें. त्यांचे समाधानार्थ व पेशवे यांजकडून उपाध्ये करवे व आप्त राजमाचीकर हे येऊन रीतीप्रमाणें सांत्वनाच्या सर्व गोष्टी झाल्या. त्याचप्रमाणें माहादजी शिंदे यांचे लष्करांतील नामांकित सरदार व मुत्सद्दी जे शिवाजी विठ्ठल यांचे उत्तर हिंदुस्थानांतील परम स्नेही होते, त्यांनींही येऊन त्यांचें समाधान केलें. नंतर खंडेराव यांनीं तुळापूर येथें भीमा आणि इंद्रायणी यांचे संगमावर शिवाजीपंत बापू यांचें उत्तरकार्य केलें. पुढें ते श्रीमंत माधवराव पेशवे यांचे भेटीस्तव पुण्यास गेल्यावर श्रीमंतानीं त्यांस लागलीच सरदारीचीं वस्त्रें देऊन तत्संबंधी मुलुकाच्या सनदाही करून दिल्या. नंतर थोडक्याच दिवसांनीं खंडेराव विठ्ठल हे श्रीमंतांच्या परवानगीनें आपल्या मुलुकाची व्यवस्था करण्यास्तव विंचुरास गेले. तेथें त्यानीं पदरच्या मंडळीचा दरबार करून त्यांत सर्वांबरोबर अश्वासनाचें संभाषण केलें; आणि ज्या कितीएक पदरचे मंडळीवर कारण परत्वें आपली इतराजी झाली होती, त्या सर्वांस क्षमा करून ते पूर्वी ज्यां ज्यां कामांवर होते त्यां त्यां कामांवर त्यांस कायम केलें. अशा प्रकारें त्यानीं सर्व व्यवस्था करून पूर्ववत् सर्व कामकाज चालू केलें.

नंतर थोडकेच दिवसांनीं पेशवेसरकार व मोंगलसरकार यांमध्यें बेबनाव झाला; आणि तो वाढत जाऊन शेवटीं त्याची मजल युद्धापर्यंत येऊन पोहोंचली. तेव्हां प्रत्येक मराठे सरदारानें आपले फौजेची तयारी व किल्यांचे बंदोबस्त करण्यास आरंभ केला. त्याप्रमाणें खंडेराव विठ्ठल यानींही पदरचे जुने वाकिफ कारभारी व सरदार यांचे सल्यानें आपले फौजेची तयारी व किल्यांची बंदोबस्ती चालविली. इतक्यांत पेशवे यांजकडूनही त्यांस फौजेची भरती करण्याविषयीं जरूरीचा हुकूम आला. तेव्हां त्यानीं आपले वडील विठ्ठल शिवदेव व बंधु शिवाजी विठ्ठल यांनीं ज्याप्रमाणें कीर्ति मिळविली होती त्याप्रमाणें आपणही ह्या उद्भवलेल्या लढाईंत कीर्ति संपादन करावी अशा उमेदीनें पूर्ण लक्ष लावून फौजेची कडेकोट तयारी केली. परंतु दुर्दैवेंकरून त्या प्रसंगीं त्यांची प्रकृति बिघडली. हें त्यांचें दुखणें दिवसेंदिवस वाढत जाऊन त्याजवर क्षयरोगाचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यांचे पदरीं वैद्य चांगले असून औषधोपचारही चालले होतेच; परंतु त्यांस आराम न होता तो रोग असाध्य असें पुष्कळ सुज्ञ लोकांस वाटूं लागलें. इतक्यांत युद्धाचा प्रसंग समीप येऊन पोहोंचला; पुरातन मंत्रीमंडळीपैकीं सखारामबापू, चिंतो विठ्ठल, बाबूराव फडनवीस वगैरे पूर्वीचे अधिकारांतून निघून पेशव्यांचे सर्व दौलतीचा कारभार नाना फडनवीस यांचे हातीं आला होता; कोणतेंही सरकारी काम त्यांचे हुकुमाशिवाय होत नसे; आणि नानांचा स्वभाव दीर्घद्वेषी असून त्यांस जात्याभिमानही विशेष होता; शिवाय दादासाहेब यांचे लोभांतील मंडळीविषयीं त्यांचें अंतःकरण शुद्ध नव्हतें; खंडेराव विठ्ठल हे जरी दादासाहेब यांचे हाताखालीं वागलेले नव्हते, तरी ते विठ्ठल शिवदेव यांचे पुत्र होते येवढयाच कारणानें त्यांजवर नाना फडनवीस यांचा लोभ नव्हता. या सर्व कारणांस्तव या प्रसंगीं लढाईंत स्वतः सामील होऊन पराक्रम करून दाखविणें

हें खंडेराव विठ्ठल यांस अवश्य कर्तव्य होतें. सबब प्रकृति बिघडलेली असतांही ते आपले फौजेनिशीं पुण्यास हजीर होऊन पेशव्यांचे फौजेबरोबर रणभूमीवर गेले.

वर लिहिलेल्या युद्धाकरितां पेशव्यांचे हुकुमावरून दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर, रघोजी भोंसले, गोविंदराव गाईकवाड ह्यांचा सरदार, खंडेराव विठ्ठल विंचूरकर, पटवर्धन, रास्ते, राजेबहादर, प्रतिनिधि, पंतसचीव, या शिवाय मराठे मानकरी, निंबाळकर, घाटगे, चव्हाण, डफळे, पवार, थोरात, पाटणकर वगैरे पुणें येथें आपापल्या लष्करांनिशीं येऊन पोहोंचले.

या प्रसंगीं पेशवे अल्प-वयस्क असल्या कारणानें एकंदर सैन्याचा मुख्य सेनापती कोणास करावें याचा विचार करण्यास्तव नाना फडनवीस यानीं मुत्सद्दी लोक जमा केले. त्या कचेरींत बोलणें चाललें असतां त्यांत दौलतराव शिंदे यांस मुख्य सेनापती करण्याचा उपक्रम निघाला; परंतु शिंद्यांचे लष्करांत जी शेणवई मंडळी प्रमुख होती त्यांविषयीं नानांचें अंतःकरण शुद्ध नव्हतें, ह्मणून दौलतराव हे अल्पवयस्क असून अनुभवलेले नाहींत याकरितां त्यांस तो अधिकार देणें रास्त नाहीं, असें त्यांचें ह्मणणें पडलें. तेव्हां हा अधिकार चालविण्यास तुकोजी होळकर नेमावे अशी कित्येक मुत्सद्यांची सल्ला पडली. परंतु होळकर यांस तो अधिकार दिला तर शिंद्यांचे पदरची शेणवई मंडळीही मोठी मानी असून तिजकडे शिंद्यांचे लष्करी अधिकार आहेत यामुळें चांगला परिणाम न होतां उलटी स्पर्धा मात्र वाढेल असें नानांनीं सांगितलें. त्याजवर रघुजी भोंसले हे चांगले अनुभवलेलें व शूर असल्यामुळें त्यांस तो अधिकार द्यावा असें कित्येकांचें ह्मणणें पडलें; परंतु असें केल्यानें शिंदे व होळकर हे नाखूष होतील असें पुष्कळांनीं बोलून दाखविलें; सबब तो अधिकार प्रतिनिधीस द्यावा अशी हरीपंत फडके यानीं सूचना केली. परंतु त्या वेळचे प्रतिनिधी युद्धकर्मांत अनुभवलेले नव्हते, सबब पेशव्यांचें हुजूर

वागणाऱ्या सरदारांपैकींच कोणास तरी तो अधिकार द्यावा असा विचार निघाला. त्या वेळेस कांहीं जणांनीं विंचूरकर यांचें नांव घेतलें; परंतु तेही नुकतेच सरदारीवर कायम झालेले असून अजारी होते सबब आणखी कोणास तरी तो अधिकार दिला पाहिजे असें नाना फडनवीस यांस वाटून शेवटीं परशुरामभाऊ पटवर्धन हे मोठे जवांमर्द असून त्यांनीं बहुत रणसंग्राम पाहिले आहेत याकरितां त्यांसच तो अधिकार द्यावा असा त्यांनीं ठराव केला. त्यावरून सदर्हू जमलेल्या सरदारांपैकीं कित्येक सरदार कुरकुर करूं लागले. हें वर्तमान नाना फडनवीस यांस कळल्यावर त्यांनीं सर्वांच्या छावण्यांत जाऊन त्यांच्या समक्ष भेटी घेतल्या, आणि त्यांस योग्य कारणें दाखवून सर्वांचें समाधान केलें. त्याप्रमाणेंच त्यांनीं खंडेराव विठ्ठल यांजकडे येऊन त्यांस असें सांगितलें कीं, "आपली प्रकृति दुरुस्त नसल्यामुळें लढाईंत जाण्यास आपणांस सामर्थ्य नाहीं, सबब मी मुख्य सरदारी परशुरामभाऊ यांजकडे सांगितली आहे. आपण रणांगणांत बहुत तसदी न घेतां चिमणाजी खंडेराव व बाबूरावनाना कोटमगांवकर यांजकडे लढाईचा अधिकार सोंपून देऊन स्वतः देखरेख मात्र करीत जावी." पुढें थोडक्याच दिवसांनीं सरकार स्वारी सोलापूरपर्यंत जाऊन निजामाशीं लढाई सुरू झाली. या लढाईचा इतिहास बहुतकरून सर्वांस माहित आहेच. सबब त्याची सविस्तर हकीकत या चरित्रांत लिहिण्याची अवश्यकता दिसत नाहीं. तथापि इतिहासाचा क्रम खंडित न दिसण्याकरितां तिचा सारांश मात्र येथें देतों.

निजामाची फौज मोठी व कडवी असून तिजवरील रसदारही अनुभवलेले व शूर असे होते; यामुळें पेशव्यांचे आघाडीचे टोळीचा हल्ला त्यांनीं तेव्हांच परतविला. नंतर दुसरा हल्ला झाला त्यांतही मोगलांनीं शौर्येकरून पेशव्यांचे फौजेचें कांहीं चालूं दिलें नाहीं. तेव्हां नाना फडनवीस यांस मोठी फिकीर प्राप्त झाली; प-

रंतु शिंदे यांजकडील कवाइती फौजेवरील सरदार जिउबादादा यानें असें सांगितलें कीं, " आपण स्वस्थ असावें; मी आतां काय करामत करितों ती पाहावी. " असें बोलून तो सरदार आपले छावणींत परत गेला. तेथें त्याची लढण्याची तयारी होतीच. मग त्यानें मान्याचे जाग्यावर तोफा चढवून तेथून निजामांचे फौजेवर गोळा चालू केला. निजामांचे फौजेंतील कवाइती पलटणें रेमंड नांवाचे फ्रेंच सरदाराचे हाताखालीं होतीं. त्या फ्रेंच सरदारानें पेशव्यांकडील कवाइती फौजेचा गोळा ओळखून, ज्या बाजूस शिंद्यांच्या तोफा लागल्या होत्या त्या बाजूस जाऊन त्या तोफांवर आपले कवाइती तोफखान्याचा गोळा सुरू केला. परंतु शिंद्यांचे कवाइती फौजेवरील पीनर नांवाचा सरदार यास लढाई लांबविणें प्रशस्त न वाटून त्यानें असें मनांत आणिलें कीं, खुद्द निजामांस रणांतून पळ काढण्यास लाविलें म्हणजे त्यांची फौज धर धरणार नाहीं. यास्तव ज्या ठिकाणीं तो हत्तीवर अंबारींत बसला होता, तेथें त्यानें पांच गोळे नेमानें मारिले. ते जरी निजामास लागले नाहींत, तरी तो हत्ती घाबरून माघारा पळून गेला. तें पाहून त्याचे सर्व फौजेस भीति उत्पन्न होऊन तीही पळून गेली. इतक्यांत मराठे स्वारांनीं हल्ला करून त्यांचे सैन्याची पुष्कळ कत्तल उडविली. निजामानीं खरडे गांवाचा आश्रय करून त्याच्या वेशी बंद केल्या; तों सायंकाळ होऊन अंधार पडला, सबब लढाई बंद झाली. दुसरे दिवशीं सकाळीं मराठे स्वारांनीं पुनः चाल केली, तों निजामांची फौज पळून गेली होती. त्या लोकांनीं तोफा व दारूगोळा वगैरे सामान टाकून दिलें होतें तें या स्वारांनीं ताब्यांत घेऊन पुढें चाल केली. इतक्यांत निजाम खरडे गांवच्या वेशी बंद करून आंत राहिले आहेत असें त्यांस कळलें. तेव्हां त्यांनीं त्या गांवास वेढा घालून त्यावर दोन दिवसपर्यंत तोफा चालविल्या. शेवटीं निजामानीं जेर होऊन पेशव्यांकडे तहाचें बोलणें बोलण्यास वकील पाठविला. तेव्हां पेशव्यानीं त्यांस तहाच्या शर्ती कळविल्या त्या येणेंप्रमाणें:—

१. तुमचे मुख्य वजीर मषीर उलमुल्क यानीं आमचे वकीलांबरोबर भर दरबारांत आमचे मुख्य दिवाण नाना फडनवीस यांविषयीं बेआदबीचें भाषण केलें आहे त्याचा बदला मिळण्यास्तव त्यांस प्रथम आमच्या हवालीं करावें.

२. पूर्वी सदाशिवरावभाऊसाहेब यानीं उदगीर येथील तहांत जो पासष्ट लक्षांचा मुलुक तुह्मांपासून घेतला होता तो तुह्मांस परत मिळाला आहे तो आमचा आह्मांस द्यावा.

३. तुमच्या मुलकाची मर्यादा परंड्यापासून उत्तरेस तापीपर्यंत आहे त्यांतील कांहीं मुलुक दौलताबादेचे किल्यासह आम्हांस द्यावा.

४. आमचे तीन कोट रुपये तुह्मांकडे बाकी येणें आहेत तें आम्हांस रोख द्यावे.

५. रघुजी भोंसले यांचे गंगथडी प्रांतांतील घासदाण्याबद्दल एकुणतीस लक्ष रुपये तुम्हांकडे बाकी राहिली आहे ती तुम्हीं त्यांस रोख द्यावी, आणि भोंसले यांनीं गंगथडींत पुनः घास दाणा न मागावा, याकरितां त्यांस दरसाल तीन लक्ष आठ हजार रुपये उत्पन्नाचा मुलूक द्यावा.

६ वऱ्हाडांत जो तुमचा मुलूक आहे त्याचा वसूल तुम्हीं पूर्वीच्याचालीप्रमाणें घेत जावा.

७. या लढाईसंबंधी आमचा सर्व खर्च तुम्हीं भरून द्यावा.

पहिली शर्त खेरीज करून बाकीच्या सर्व शर्ती कबूल करण्याचें निजामांस जड वाटलें नाहीं; परंतु मषीर उलमुल्क यांस पेशवे यांचे स्वाधीन करण्याची मात्र त्यांस पंचाईत पडली. त्या समयीं मषीर उलमुल्क हे निजामास ह्मणाले कीं, "खुदावंद! या तहांत पेशवे यानीं कांहीं अमर्याद मागितलें नाहीं. मला त्यांचे स्वाधीन करण्यास आपण बिलकुल मागें पुढें पाहूं नये. मी त्यास राजी आहें." असें बोलून आपल्यास नेण्याकरितां जी मराठे स्वारांची

टोळी आली होती तिजबरोबर ते चालते झाले. नंतर तहनामा पुरा झाला.

या लढाईंत पेशव्यांकडील फौजेचें विशेष नुकसान झालें नाहीं. परंतु निजामांकडील फौजेचें नुकसान बरेंच झालें असें म्हणण्यास चिंता नाहीं. कारण, त्या लढाईंत निजामांकडील जे मोठमोठाले सरदार पडले त्यांच्या कबरा खरडे गांवाच्या उत्तरेस कायम आहेत; त्यांची संख्या सुमारें दोन हजारावर होईल. या वरून शिपाई किती पडले असावे हें सहज अनुमान करितां येईल. ही लढाई तारीख ११ माहे मार्च सन १७९५ इसवी रोजीं झाली.

खडर्याचे लढाईंत खंडेराव विठ्ठल यांजकडून विशेष लिहिण्यासारखी गोष्ट झाली नाहीं. कारण ती लढाई बहुत दिवस न चालतां लवकरच समाप्त झाली. बहुतेक सरदारांस व फौजेसही त्या लढाईचे संबंधानें विशेष आयास पडले नाहींत. तथापि खंडेराव विठ्ठल हे पूर्वीच दुखणेकरी असल्यामुळें त्या लढाईंत जे त्यांस कांहीं थोडे श्रम झाले त्यापासून त्यांची प्रकृति जास्त बिघडली. ती लढाई संपल्यावर मराठी फौज पुण्यास परत जाऊं लागली, तेव्हां खंडेराव यांस प्रकृतीचा भरंवसा वाटेना; सबब त्यांनीं नाना फडनवीस यांस कळवून खडर्यापासून पंचवीस तीस कोसांवर नरसिंहपूर क्षेत्रीं आपले कुलस्वामीचे दर्शनाकरितां जाण्याविषयीं श्रीमंतांची आज्ञा घेतली; आणि ते लागलेच नरसिंहपुरास जाऊन दाखल झाले. तेथें कांहीं दिवस राहून औषधोपचार व ईश्वरसेवा बहुत केली. परंतु दिवसेंदिवस त्यांची प्रकृति जास्तच बिघडत चालली. तेव्हां त्यानीं पुष्कळ पैसा खर्च करून दानधर्म व ब्राम्हणभोजनें वगैरे धर्मकृत्यें बहुत केलीं. शेवटीं एके दिवशीं प्रकृति अतिशय बिघडलीशी वाटली तेव्हां त्यानीं चिमणाजी खंडेराव, बाबूरावनाना कोटमगांवकर, बाळोबाबाबा सालकाडे कारभारी, वगैरे पदरची मंडळी जमा करून आपले पुत्र नरसिंहराव आपलेजवळ बोलाविले आणि त्यांचे हात त्या कारभारी मंडळीचे हातांत देऊन, "आतां

माझे ठिकाणीं या मुलास तुम्हीच आहां " असें सांगून, वैशाख शुद्ध ६ रोजीं ते वैकुंठवासी झाले. नंतर त्यांचे पुत्र नरसिंह राव यानीं आपले वडिलांचें उत्तरकार्य भीमा आणि निरा या संगमतीर्थीं उत्तमप्रकारें केलें. खंडेराव विठ्ठल यांचे मरणानें त्यांचे पुत्रास व पदरचे मंडळीस फार दुःख झालें. त्यांस सरदारीचीं वस्त्रें मात्र मिळालीं होतीं; परंतु त्याचा उपभोग त्यानीं कांहींच केला नाहीं, कां कीं, त्या वेळेपासून दाहा महिन्यांचे आंतच त्यांचा अंतकाळ झाला. त्या दहा महिन्यांतूनही बहुत दिवस प्रकृतीचे बेआरामींतच गेले. त्यामुळें तर त्यांचे चिरंजीवास व पदरचे मंडळीस फारच दुःख वाटलें.

खंडेराव विठ्ठल यांची प्रथम स्त्री निवर्तल्यावर त्यानीं दुसरें लग्न केलें. त्या बाईचें नांव गंगाबाई. तीस एक पुत्र झाला; त्याचें नांव नरसिंहराव असें होतें.

खंडेराव विठ्ठल हे चिटणिशी व जमाखर्ची लिहिण्यांत फार हुषार असून मोठे मुत्सद्दी होते. शिवाय ते संस्कृत शिकलेले असून नवीन संस्कृत कविता करण्याचेंही त्यांस चांगलें अंग होतें.

त्यांस सरदारीचीं वस्त्रें मिळाल्यावर ते बहुत दिवस वांचले नाहींत, ह्मणून त्यांचे हातून विशेष लिहिण्याजोगें एकादें धर्मकृत्य घडलें नाहीं. फक्त विंचुरानजीक एक कोसाचे अंतरावर एका टेंकडीवर देवीचें प्राचीन स्थान आहे, त्याजवर त्यानीं देवालय बांधिलें. या देवीस कोणजाई असें ह्मणतात.

खंडेराव यांचा वर्ण गोरा असून ते सुस्वरूप होते. त्यांची अंगकाठी उंच होती, व त्यांचा स्वभाव रागीट आणि खुनशी असे, तत्रापि त्यांचे हातून कोणाचें कधींही नुकसान झालें नाहीं.

नरसिंह खंडेराव यांचें चरित्र.

खंडेराव विठ्ठल यांचे चिरंजीव नरसिंह खंडेराव यांस सरदारीचीं वस्त्रें मिळण्याकरितां त्यांचे वडिलांचे कारभारी चिमणाजी खंडेराव व बाळोबा बावा सालकाडे यांनीं पुण्यास जाऊन प्रथम नाना फडणीस यांची भेट घेतली आणि त्यांस खंडेराव विठ्ठल परलोकवासी झाल्याचा मजकूर श्रुत करून नरसिंह खंडेराव यानीं त्यांस दिलेलें पत्र त्यांचे स्वाधीन केलें. तेव्हां नाना म्हणाले कीं, "खडर्याचे लढाईपूर्वी मीं त्यांची प्रकृति पाहिली होती; त्या वेळेसच मला तिचें मान बरें दिसलें नाहीं, आणि वैद्य मंडळीनींही ती असाध्य असल्याचेंच मला कळविलें होतें. ईश्वरसत्तेस उपाय नाहीं; असो; शाहू माहाराजांनीं विठ्ठल शिवदेव यांस बाजीरावसाहेब पेशवे यांचे पदरीं घातल्यासारखें त्यांनीं व त्यांचे पुत्रांनींही सरकारचाकरी योग्य रीतीनें करून वाहवा मिळविली यांत संशय नाहीं; तेव्हां आतां विंचुरकरांची दौलत व सरदारी यांविषयीं सरकारास योग्य विचार केलाच पाहिजे. नरसिंहपुरास जाण्याचे वेळेस खंडेराव हे माझा निरोप घेण्यास आले, तेव्हां नरसिंहरावही हे त्यांजबरोबर होते. त्यावेळेस त्यांची चलाखी व हुशारी पाहून मला बहुत संतोष वाटला. असो; आतां त्यांस श्रीमंतांचे दर्शनार्थ लवकर घेऊन यावें. सरकार त्यांस सरदारीचीं वस्त्रें सत्वर देतील." याप्रमाणें सांगून नानांनीं उभयतांस निरोप दिला. नंतर चिमणाजी खंडेराव हे सनदा तयार करण्याचे कामीं मदत लागल्यास ती करण्याकरितां पुण्यास राहिले आणि बाळोबा बावा हे नरसिंगराव यांस पुण्यास आणण्याकरितां नरसिंहपुरास गेले. नरसिंहराव हे आपला कुलस्वामी नरहरी यास नमस्कार करून त्याजबरोबर पुण्यास निघून गेले. तेथें नानांची भेट झाल्यानंतर त्यांचे विद्यमानें नरसिंहराव याणीं श्रीमंतांची भेट घेतली. नरसिंहराव यांस पाहून श्रीमंत बहुत खुष झाले; आणि त्याच

दिवशीं त्यांनीं पूर्वीप्रमाणें त्यांस सरदारीचीं वस्त्रें व मुलकांच्या सनदा दिल्या. या सनदा देते वेळेस नाना फडणीस म्हणाले, का "जरी तुमची उमर बारा वर्षांहून जास्त नाहीं, तरी तुमचे वडिलांची स्वामिनिष्टा व इमानदारी यांजवर नजर देऊन श्रीमंतांनीं हा अधिकार तुम्हांस दिला आहे. या करितां तुम्हीं पदरचे जुने मंडळीचे विचारें वागावें आणि सरदारीस योग्य असा विद्याभ्यास करून लवकरच सरकारची नोकरीस स्वतः बजावण्यास समर्थ व्हावें. तुम्ही दौलत संभाळण्यास योग्य व्हाल तोंपर्यंत बंदोबस्ताची सर्व जोखीम चिमणाजी खंडेराव व बाळोबा बाबा यांजवर ठेवली आहे." असें बोलून नानांनीं त्यांस रजा दिली.

नरसिंहराव कारभारी मंडळीसह विंचूरास परत गेल्यावर त्यांनीं सर्व मानकरी व पदरची मंडळी जमा करून ज्यांचीं कामें त्यांनीं करण्याविषयीं हुकूम दिला. तेणेकरून सर्व व्यवस्था पूर्ववत् चालू झाली. पुढें लवकरच कारभारी यांनीं नरसिंहराव यांस शिपाईगिरीचे कामांत हुशार करण्यासाठीं, गोपाळराव पटाईत नामें गृहस्थास त्यांचे शिक्षक नेमिलें. हा मनुष्य घोड्यावर बसण्यांत, भाला व तलवार चालविण्यांत, व शिपाईगिरीचे इतर सर्व कामांत मोठा प्रवीण होता. शिवाय त्यांस लिहिणें वाचणें वगैरे कारकुनीचें काम शिकविण्यास देवबा भाऊ या नांवाचा एक चांगला इमानी कारकून यास नेमिलें; खेरीज संस्थानचे कारखान्यांत एक मुनषी होता, त्यास त्यांजला फारशी भाषा शिकविण्यास नेमिलें. तसेंच त्यांस वेद वगैरे ब्रह्मकर्मसंबंधीं सुशिक्षा देण्यास केशवभट मोघे ह्मणून संस्थानचे एक आश्रित ब्राह्मण यांची योजना केली; याप्रमाणें कारभारी यानीं नरसिंहराव यांस हुशार करण्याची सर्व व्यवस्था केली; आणि कोणते समयीं कोणते विद्येचा अभ्यास करावा त्याच्या वेळां नेमून देऊन त्यांजवर सर्व प्रकारें देखरेख करण्यास व हमेषा त्यांचे शरीर प्रकृतिची वगैरे व्यवस्था पाहाण्यास त्र्यंबक येथील राहा-

णार काशीपंत बाबा जोगळेकर यांस नेमिलें. हे गृहस्थ त्या वेळेस संस्थानांत नुकतेच नोकर राहिले होते; परंतु पुढें त्यांनीं इमानानें वर्तन केल्यावरून त्यांस, बाळोबा बाबा यांचे हाताखालीं संस्थानचे तर्फेनें पेशव्यांचे दरबारांतील वकील, असा अधिकार प्राप्त झाला. सांप्रत त्यांचे चिरंजीव नारायणराव जोगळेकर हे त्र्यंबक येथील देवाचे संस्थानावर कारभारी आहेत. ह्यांचे वडील काशीपंत बाबा यांस विंचूरचे संस्थानांतून जें उत्पन्न मिळत होतें, त्याचे ऐवजी हाल्लींचे संस्थानचे मगदुराप्रमाणें इनाम व सनदी जमीन मिळून सुमारें ४०० रुपयांचें उत्पन्न चालत आहे. असो; वर सांगितल्याप्रमाणें नरसिंहराव यांचे विद्याभ्यासाची व्यवस्था केल्यानें त्यांचा अभ्यास उत्तम प्रकारें चालू लागला.

चिमणाजी खंडेराव दिवाण हे अशक्त झाल्यामुळें त्यांनीं नाना फडणवीस यांचे परवानगीनें बाळोबा बाबा ह्यांजकडे आपलें काम सोंपून दिलें. त्यावेळेस शिवाजी विठ्ठल यांची ज्येष्ठ स्त्री माईसाहेब सायखेड्यास होती. तीस भेटण्याकरितां नरसिंह खंडेराव हे मातुश्रीसह पुढें लौकरच सायखेड्यास गेले. चिमणाजी खंडेरावही त्यांजबरोबर जाऊन त्या वृद्ध बाईस भेटले. नरसिंह खंडेराव यांस माईसाहेबांनीं पाहिलें तेव्हां त्यांस मागील काळाचें स्मरण होऊन त्यांनीं नरसिंहराव यांस पोटाशीं धरिलें, आणि "आपले वंशांत पुष्कळ पुरुष झाले असून आतां त्यांचा अंकुर म्हणून तूंच एकटा राहिला आहेस ईश्वर तुझें कल्याण करो," असे बोलून त्या फार कष्टी झाल्या. अस्तु! मग त्यांनीं नरसिंहराव यांस कांहीं दिवस आपले जवळ ठेवून घेतलें. पुढें नरसिंहराव हे त्यांची रजा घेऊन विंचूरास गेले; परंतु त्यांची मातुश्री माईसाहेबांजवळच राहिली. त्यांस पुढें थोडे दिवसांनीं तेथें देवाज्ञा झाली. नरसिंगराव विंचूरास आल्यावर, उत्तर हिंदुस्थानचे माहालां संबंधीं कामकाज पाहाण्यास विंचुराहून एक हुशार मनुष्य नेमून पाठविणें जरूर पडलें. त्यावरून त्यांनीं मशिदीचें रांजणगांव ये-

थील गणेश राजाराम नांवाचे मनुष्यास तिकडे पाठवून त्याजकडे मुलुकाचा वसूल, शिंद्याचे तैनातीस ठेविलेल्या पागेची सरदारी, आणि शिंद्यांचे दरबारांतील वकीली इतके अधिकार सांगितले. या मनुष्यावर पुढें थोडक्याच दिवसांनीं दौलतराव शिंदे यांची मेहेरबानी होऊन त्यांनीं त्यास मोठ्या योग्यतेस चढविलें.

पुढें भाद्रपदमाशीं नरसिंहराव हे पुण्यास दसऱ्याकरितां फौजेनिशीं गेले. ह्यावर्षी सर्व सरदारांनीं त्या सणाकरितां आपापल्या फौजेची उत्तम प्रकारची तयारी केली होती, कारण थोडकेच महिन्यांपूर्वी पेशवे यांनीं खर्डे येथें मोघलाचा मोड करून जो मोठा जय मिळविला होता त्याबद्दल त्या सणाचे दिवशीं आनंद प्रदर्शित करण्याचा बेत ठरला होता. पेशवेसरकारचे फौजेचीही उत्तम प्रकारची तयारी झाली होतीच. दसऱ्याचे दिवशीं श्रीमंतांची स्वारी सीमोलंघनास निघाली त्यावेळेस तिचा थाट केवळ युद्धाचे अपूर्व तयारीचा होता. तो पाहून पुण्यांतील लोक अशी कल्पना करूं लागले कीं थोडकेच दिवसांत पेशवे काबूलावर स्वारी करून पानिपतचे पराजयाबद्दल अफघान लोकांचा सूड घेतील; परंतु ती कल्पना सर्वप्रकारें व्यर्थ झाली, कारण संपूर्ण मराठीराष्ट्राचे दुर्दैवामुळें पुढें लवकरच पुणें येथें अकल्पित व अत्यंत दुःखाची अशी एक गोष्ट घडली. तेणेंकरून ज्याप्रमाणें दीप मालवला म्हणजे एकदम चोंहीकडे अंधःकार होतो तद्वत सर्वांचे मनांतील उत्छाह व उमेदी एकदम नष्ट झाल्या! ती गोष्ट अशी कीं, श्रीमंत माधवरावसाहेब यांचें मन कांहीं दिवसांपासून कितीएक कारणांनीं अगदीं उदास झालें होतें; आणि त्या ऊदासीनतेचे भरांत त्यांनीं एके दिवशीं शनवारचे वाड्यांत गच्चीवरून खालीं चौकांत उडी टाकिली. तेणेंकरून त्यांचे हातांपायांस मोठ्या जखमा होऊन कारंजाची नळी त्यांचे मांडींत शिरली. पुढें दोन दिवसांनीं त्यांस त्यामुळेंच देवाज्ञा झाली.

या संधीस पुणें येथें व संपूर्ण महाराष्ट्र देशांत नाना प्रकारचीं राजकारणें झालीं; त्यांचा विस्तार या चरित्रांत लिहिणें अप्रासंगिक

आहे असें वाटतें. यास्तव तसें न करितां थोडक्यांत असें दर्शवितों कीं, पुष्कळ घालमेली होऊन शेवटीं शिंदे यांचे मदतीनें दादासाहेब पेशवे यांचे चिरंजीव बाजीराव हे पेशवाईचे गादीवर कायम झाले. ही गोष्ट तारीख ४ डिसेंबर सन १७९६ इस्वी रोजीं घडली.

नंतर नाना फडनवीस, दौलतराव शिंदे, परशुराम भाऊ पटवर्धन, बाजीराव साहेब पेशवे, शिंद्यांचे दिवाण बाळोबा तात्या, जिवबादादा व लखोबादादा वगैरे मुत्सद्दी मंडळींमध्यें अनेक प्रकारचीं राजकारणें व उलाढाली झाल्या. तेणेंकरून पेशव्यांचे राज्यास बळकटी न येतां, थोरले शिवाजी माहाराज यानीं मराठी राज्याचा मजबूत पाया घालून त्यावर जी मोठी भव्य इमारत रचली होती व जी थोरले बाजीराव, नाना साहेब व थोरले माधव राव पेशवे यांनीं शिखरास पोहोंचविली होती, त्या इमारतीस खणती लागून ती जमीनदोस्त होण्याचीं चिन्हें सुज्ञपुरुषांस दिसूं लागलीं.

वर लिहिलेल्या उलाढाल्यांत विंचूरकर यांचे कारभारी यांनीं आपले मालिक अज्ञानावस्थेंत आहेत असें पाहून कोणतेही राजकारणांत न शिरतां अगर कोणाचेही पक्षास न मिळतां एकनिष्टेनें वर्तन केलें; आणि ज्या ज्या वेळेस त्यांस पेशवे यांजकडून लष्करी कामगारीवर जाण्याविषयीं हुकूम झाले त्या त्या वेळेस त्या कामगाऱ्या इमानदारीनें बजावून कोणतेही सरकारी मुत्सद्याशीं किंवा सरदाराशीं न बिघडतां सर्वांचीं मनें खुष ठेविलीं. सारांश, ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं विंचूर संस्थानचे कारभारी यांनीं मोठ्या चातुर्यानें वर्तन केलें ही गोष्ट त्यांस मोठी भूषणास्पद होय.

याच प्रमाणें सन १७९७ इसवी सालीं तुकोजी होळकर यांचा देहांत झाल्यानंतर किती एक राज्यकारणें व तंटेबखेडे झाले; त्याशींही विंचूरकर घराण्याचा अगर त्याच्या पदरच्या कामगारांचा मुळींच

संबंध नव्हता, सबब या चरित्रांत त्याविषयीं कांहींच न लिहितां त्या अविचाराच्या तंटाबखेडयामुळें मराठयांचें राज्य दुर्बल होण्यास जीं मुख्य कारणें झालीं त्यांची हकीकत मात्र पुढें थोडक्यांत लिहितों.

तुकोजी होळकर यांस दोन औरस पुत्र होते. त्यांचीं नांवें काशीराव व मल्हारराव: याशिवाय दोन दासीपुत्र होते; त्यांचीं नांवें यशवंतराव व विठुजी अशीं होतीं. काशीराव हे मनानें व शरीरानें दुर्बल होते; परंतु मल्हारराव हे हरएक प्रकारें आपले घराण्याचें ऐश्वर्य संभाळण्यास योग्य झाले असतां, त्या उभयतां बंधुंमध्यें लवकरच तंटा उपस्थित झाला. त्यांत दासीपुत्रांनीं मल्हाररावांचा पक्ष स्वीकारला. नंतर थोडकेच दिवसांनीं मल्हारराव हे आपले वडील बंधूच्या लष्करांतून थोडया फौजेनिशीं निघून पुण्यानजीक भांबुर्डें येथें जाऊन राहिले. त्यांस नानाफडनवीस यांची आंतून मदत होती. त्यांस कैद करण्यास्तव काशीराव यांनीं सिंदे यांजपाशीं मदत मागितली. हें मागणें सिंद्यांस अपेक्षित होतेंच, सबब त्यांनीं त्यांस पकडण्यास्तव लागलीच फौज पाठविली. त्या फौजेनें मल्हारराव यांस पकडण्याचा यत्न केला. परंतु आपले बचावाकरितां त्यानीं जिवावर उदार होऊन बिकट लढाई केली; तत्रापि ते शेवटीं मारले गेले; परंतु त्यांचे पुत्र खंडेराव हे सिंद्यांचे हातीं लागले असतां, त्यानीं त्यांस कैदेंत ठेविलें. हें पाहून मल्हारराव यांचे दोघे कमसल बंधू निरनिराळे ठिकाणास पळून गेले. पैकीं यशवंतराव नागपुरास व विठोजी कोल्हापुरास, असे गेले. काशीराव हे सरदारी चालविण्यास अयोग्य असल्यामुळें होळकरांचें घराणें कांहीं वर्षेपर्यंत सिंद्यांचे दयेवर अवलंबून राहिले.

याकाळीं संपूर्ण महाराष्ट्र देशांत निर्नायकी झाली असून बंडवाले स्वारांच्या टोळ्यांनीं चोहोंकडे लूटालूट चालविली होती. या बंडवाल्या टोळ्यांपैकीं एक टोळी बाळकृष्ण गंगाधर कानडे यांचे

हाताखालीं होती. तींत विठुजी होळकर सामील होते. त्या बंडखोर टोळीवर पेशव्याकडून गणपतराव पानशे हे गेले असून त्यानीं बंडवाल्यांचा मोडही केला; आणि विठुजी होळकर यांस कैद करून पुण्यास नेलें. तो गुन्हा मराठे लोकांचे रीतीप्रमाणें मरणाचे शिक्षेस पात्र नव्हता; तत्रापि बाळोजी कुंजर म्हणून शेवटचे बाजीराव पेशवे यांचे कृपेंतील एक शिलेदार होता, त्याचे सूचनेवरून त्यानीं त्यांस हत्तीचे पायाशीं बांधून जिवें मारविण्याचा ठराव केला.

विठुजी हे एक मोठ्या नामांकित लष्करी सरदाराचे वंशांतील पुरुष होते, म्हणून त्यांस एक सामान्य मनुष्याप्रमाणें अघोर मरणाची शिक्षा देणें वाजवी नाहीं असें नरसिंह खंडेराव विंचूरकर यांस वाटल्यावरून ते ती शिक्षा रहित करविण्यासाठीं श्रीमंतापाशीं रदबदली करण्यास निघाले. तेव्हां त्यांचे कारभारी बाळोबाबावा यानीं त्यांस आडवे येऊन, "श्रीमंतांची मर्जी एक प्रकारची आहे या करितां आपण या खटपटींत पडूं नये, कारण यापासून आपला मान राहील असें मला वाटत नाहीं" अशी त्यांस सूचना केली; परंतु त्या सूचनेकडे लक्ष न देतां, ते पुढें चालते झाले. तेव्हां कारभारी मौसूफ यांस त्यांजबरोबर अर्थांतत्र जाणें भाग पडलें. नरसिंगराव श्रीमंताजवळ पोहोंचल्यावर श्रीमंत त्यांस ह्मणाले कीं, "नरसिंव्हराव! सरदार लोकांची भेटीस येण्याची ही वेळ नव्हे. असें असतां, तुम्ही या वेळेस आला याचें कारण काय? तेव्हां नरसिंहरावांनीं विनंती केली कीं, "एक थोर सरदाराच्या एका वंशजास साधारण अपराध्याप्रमाणें अघोर मरणाची शिक्षा देण्याचा हुजुरांत ठराव झाला आहे असें मी ऐकतों. सरदार लोकांस अशा भारी शिक्षा देण्यांत येतील तर सरदार व शिपाई लोक नाखुष होतील. या करितां विनंती इतकीच आहे कीं, विठोजी होळकर यांस मरणाची शिक्षा न देतां पाहिजे तर कैदेंत ठेवावें." त्याजवर श्रीमंत म्हणाले कीं, "जें करणें तें

सरकार विचारानेंच करील. तुम्हांस याची फिकीर कशास पा-हिजे ? " श्रीमंतांच्या ह्या बोलण्यानें नरसिंगराव यांस जरा रोष आला, सबब ते पुढें कांहींच न बोलतां तेथून निघून खालचे मजल्यावर आले. तेथें त्यांस बाळोजी कुंजर सहजी सहज भेटला असतां, त्यासही नरसिंहराव बोलले कीं " होळकरांचे वंशांतील एक पुरुषास उद्इक अघोर मरणाची शिक्षा होणार असें मी ऐकतों. तुह्मी श्रीमंतांचे मसलतींत असून अशा अनुचित गोष्टी कशा होतात ? " तेव्हां कुंजर ह्मणाले कीं, " हीं कामें शिपाईगिरीचीं नसून राज्याचे बंदोबस्ताची आहेत; याकरितां आपण यांत दखल देऊं नये. " कुंजराच्या त्या बोलण्यानें नरसिंहराव यांस अधिकच त्वेष चढून त्यांचा चेहेराही बदलला; परंतु बाळोबाबाबा त्यांजबरोबर होतेच. त्यानीं त्यांची समजूत करून त्यांस माघारें नेलें. बाळोबाबाबा यानीं आपल्या बंधूस विंचूरास पत्र पाठविलें त्यांतील तिसरे कलमांत वरील हकीकत लिहिली होती. ती येणेंप्रमाणें:—

आपले धनी अन्या* साहेब यांची प्रकृति एक प्रकारची फार उतावळी असून हल्लींचा काळ फार विलक्षण. काळास अनुसरून वागण्याविषयीं बहुत प्रकारें सांगतो, परंतु लेकुरपणा असल्यामुळें लक्षांत येत नाहीं. यामुळें रात्रंदिवस काळजी ठेवावी लागते. परवाचे दिवशीं विठुजी होळकर यांस देहांत शिक्षा देण्याचे ठरल्याचें ऐकून श्रीमंतास जाऊन असें न होण्याविषयीं विनंती करावयाची ह्मणून बोलून लागलीच निघाले. मी पुष्कळ बोललों कीं आपल्यास या गोष्टीची गरज नाहीं. असे प्रकारची विनंती केली तर श्रीमंताची कदाचित् मर्जी जाईल, परंतु न ऐकत चालते झाले. तेव्हां मला बरोबर जाणें भाग झालें. श्रीमंत

---

* नरसिंहराव.

डोई* करीत बसले होते. तेथें जाऊन बोलले कीं " मोठे सरदारांचे मुलास स्वामींनीं शिक्षा योजली आहे हें करणें कोणास पसंत वाटत नाहीं. यापासून शिपाई लोक व सरदार नाखुष होतील. यावर खावंदाची मर्जी." श्रीमंत बोलले कीं " नरसिंगराव! विचारानेंच जें होणें तें होईल. त्याविषयीं तुह्मी कां काळजी करितां ?" हें उत्तर बरें न वाटल्यावरून लागलाच निरोप घेऊन निघाले. खालीं आल्यावर कुंजर भेटले. त्यांचा हात धरून एकीकडे नेऊन बोलिले कीं, " तुह्मी मूर्त मसलतदार असून अशी वाईट गोष्ट करण्यास कशी मसलत देतां ? होळकर जुने सरदार. त्यांचे वडिलानीं कशी सरकारची चाकरी केली याचा विचार न होतां त्यांचे पुत्रास देहांत शिक्षा, ही गोष्ट फार अनुचित." त्यावर कुंजर बोलिले कीं " हें राजकीय काम आहे. लढाईसंबंधी सरदार लोकांचें काम आहे. यांतील कारणें आपल्यास माहीत नाहींत." असें बोलणें चाललें असतां लागलेच डोळे फिरवून चेहरा बदलला. हें मी पाहून युक्तीनें घरीं आणिलें. असा उतावीळ स्वभाव असल्यामुळें समयीं काय बोलतील व काय करतील याचा नेम नाहीं. याची मोठी भिती वाटते. दिवस एक प्रकारचे आले आहेत. यामुळें दुसरें कांहीं न सुचतां सर्व काळ त्यांजवर लक्ष ठेवावें लागतें.

दुसऱ्या दिवशीं पेशवे बाजीराव यानीं विठोजी होळकर यास सरकारवाड्यापुढें एका हत्तीच्या पायास बांधवून तो हत्ती माहाताकडून भररस्त्यामधून पळविला. तेव्हां विठोजी अर्थातच प्राणास मुकला. ही गोष्ट तारीख १ माहे एप्रील सन १८०१ इसवी रोजीं झाली.

यशवंतराव होळकर वराडांत होते. तेथें त्यांस सदरहू गोष्टीची खबर लागतांच ज्या ज्या मनुष्यांनीं आपल्या आ-

*हजामत.

वडल्या भावास ठार मारण्याविषयीं पेशव्यांस उत्तेजन दिलें होतें, त्या सर्वांचा व शिंद्यांचा सूड घेण्याचा त्यानीं कृतनिश्चय केला! हा निश्चय सिद्धिस नेण्यासाठीं त्यांनीं नागपूराहून माळव्यांत जाऊन तेथें आनंदराव पवार याजकडून कांहीं पैसा व घोडे मिळविले; आणि त्या थोडक्याच तयारीनिशीं त्यांनीं आपली उभारणी करून लुटीचा व इतर साहस कर्मांचा क्रम सुरू केला. नंतर लवकरच त्यांस एक पेंढारी लोकांची टोळी येऊन मिळाली. शिवाय अमीरखान नांवाचा एक साहसकर्मी व पराक्रमी पठाण स्वारांच्या एका टोळीनिशीं त्यांस येऊन मिळाला. याप्रमाणें यशवंतराव यांजपाशीं सुमारें दाहा-हजार स्वार झाल्यावर त्यांनीं नर्मदातीरीं जाऊन खंडण्या वसूल केल्या; आणि शिंद्यांचाही पुष्कळ मुलूक लुटला. त्यामुळें शिंद्यांस संताप येऊन त्यांनीं काशीराव याचे कवाइती फौजेची एक टोळी डुड्रेन नामक फ्रेंच सरदाराचे हाताखालीं होती ती त्यांवर पाठविली; परंतु तिचा त्यांनीं अगदीं मोड करून टाकीला. यामुळें तर त्यांची मोठीच कीर्ति झाली! तिचा परिणाम असा झाला कीं, तो फ्रेंच सरदार आपलीं कवाइती पलटणें व तोफा घेऊन यशवंतराव यांजकडे मिळाला.

त्या वेळेस शिंदे पुण्यास होते. त्यांस ही खबर लागतांच आपल्यास अशा प्रसंगीं उत्तर हिंदुस्थानांत गेलेंच पाहिजे, अशी त्यांची खात्री झाल्यावरून त्यानीं, सर्जेराव घाटगे यांचे हाताखालीं पांच कवाइती पलटणें व अकरा हजार स्वार ठेऊन आपण सन १८०१ चे अखेरीस नर्मदेकडे जाण्याकरितां कूच केला. शिंदे मोठ्या फौजेनिशीं आपल्यावर चालून येत आहेत अशी यशवंतराव यांस खबर लागल्यावर त्यानीं चोहींकडून आपल्या फौजेच्या टोळ्या बोलावून घेऊन उज्जनीजवळ तळ दिला. त्या शहराचा बचाव करण्यासाठीं शिंदे यांनीं बऱ्हाणपुराहून लागोपाठ दोन फौजा पाठविल्या; परंतु यशवंतराव यांनीं त्या दोहींचाही तात्काळ मोड केला.

नंतर होळकरांनीं उज्जनी शहरांतून पुष्कळ खंडणी वसूल करून शिंद्यांचा तोफखाना नर्मदा नदी उतरून गेला होता त्याजवर हल्ला करण्याकरितां कूच केला; परंतु त्यांचें तेथें कांहीं चाललें नाहीं.

नंतर शिंदे नर्मदा नदी उतरून पार गेले. आणि त्यांनीं सरजेराव घाटगे यांस पुण्याहून आपले मदतीसाठीं बोलाविल्यावरून तेही सत्वर तिकडे निघून गेले. शिंदे यांनीं त्यांचे हाताखालीं स्वार व पायदळ मिळून हादा हजार फौज शिवाय चवदा कवाइती पलटणें असें देऊन त्यास इंदूर लुटण्यास पाठविलें. तेव्हां यशवंतराव आपले राजधानीचा बचाव करण्यास पुष्कळ फौज घेऊन आले, परंतु त्यांच्यानें इंदुराचा बचाव करवला नाहीं. तथापि त्यांस शिपाई लोक अधिकाधिकच मिळत गेले, व त्यांची स्थिति अशी बिघडलेली असतांही त्यांजकडे शिंद्यांचे फौजेपैकीं पुष्कळ लोक जाऊन मिळाले, तेणेंकरून त्यांस धैर्य आलें, आणि दक्षिणेंत पेशव्यांजवळ त्यांचे जे शत्रू होते त्यांचा सूड घेण्याचा त्यानीं निश्चय करून फत्तेशिंग माने यांस स्वाराचे एक जबरदस्त टोळीनिशीं पेशव्यांचे मुलकांत धामधूम करण्यास पुढें पाठविलें, आणि त्यांचे मदतीकरितां मामाहून अमीरखान पठाण यांस लवकरच रवाना केलें.

नंतर यशवंतराव आपले हाताखालचे फौजेनिशीं कुच करून बऱ्हाणपुरास पोहोंचले; आणि तेथें शिपाई लोकांस पगार वाटून त्यांनीं पुण्याकडे कूच केला. ते तापी नदी उतरून येतांच त्यांनीं आलीकडे न यावें म्हणून पेशव्यांनीं हरएक प्रकारें यत्न चालविला, तो असा कीं "तुमचें काय मागणें असेल तें कळवावें" असें त्यांस सांगून पाठवून "तुम्ही गोदावरीपलीकडे राहाल तर शिंद्यांचे व तुमचे जे तंटे आहेत ते आम्ही पंच होऊन तोडूं" असें वचन कळविलें. त्याचा जबाब यशवंतराव यांनीं पाठवि-

ला कीं, " माझा भाऊ विठुजी हा तर परलोकास गेलाच. तुम्हांस तो आतां मला परत देतां येणार नाहीं; परंतु माझा पुतण्या खंडेराव यास बंधमुक्त करून माझे घराण्याचे मुलूक माझे स्वाधीन करावे. असें झालें म्हणजे मी परत जाण्यास तयार आहें. " ह्या शर्ती बाजीराव साहेब यांनीं बाह्यात्कारी कबूल करून, खंडेरावाची मोकळीक करण्याविषयीं आम्हीं शिंद्यांस हुकूम पाठविला आहे असें यशवंतराव यांस निश्चय पूर्वक कळविलें. तत्रापि अंतून असें कपट केलें कीं, शिंद्यांस तसा हुकूम न पाठवितां खंडेराव होळकर यांस आशिरीचे किल्यांत कैदेंत ठेवावें म्हणून हुकूम पाठविला, आणि शिंद्यांचा सरदार भाऊ भास्कर यास यशवंतराव याजवर सत्वर हल्ला करावा असें लिहून पाठविलें.

फत्तेशिंग माने पंचवीस हजार फौजेनिशीं खानदेशांत आल्याचें वर्तमान पुण्यास पोहोंचल्यावर त्यांस पुढें न येऊं देण्याकरितां पेशव्यांनीं धोंडोपंत गडबोले या नांवाचे सरदाराचे हाताखालीं सरकारी स्वार व कवायती पायदळ पळटणें मिळून पंचवीस हजार फौज देऊन त्यांस मालेगांवाकडे रवाना केलें आणि मागाहून नरसिंह खंडेराव विंचुरकर यांस आपले दरोबस्त फौजेनिशीं धोंडोपंतांचे मदतीस जाण्याविषयीं हुकूम पाठविला.

नरसिंहराव यांस सरदारीचीं वस्त्रें मिळाल्यापासून त्यांनीं पांचसाहा वर्षेपर्यंत मोठ्या उत्सुकतेनें शिपाईगिरीस योग्य अशा गोष्टी म्हणजे घोडे फेरणें, बोथाटी करणें, पट्टा खेळणें, बंदुकीनें निशाण मारणें व एकंदरीनें लढाईंत ज्या हिकमती करावयाच्या असतात, त्यांचा पुर्ण अभ्यास करून, सरदारीचें कांहीं तरी महत्कृत्य करण्याची उमेद धरिली होती. शिवाय दररोज कुस्ती वगैरे कसरत करून शरीराची तयारी ही उत्तम प्रकारें केली होती, व त्या कारणानें तर त्यांचा मनोत्साह फारच वाढिला होता. तशांत त्यांच्या तारुण्याची त्या वेळेस सुरुवात असून त्यांचे

आजे विठ्ठल शिवदेव व चुलते शिवाजी विठ्ठल यांचे शौर्याच्या हकीकती वृद्ध मनुष्यांच्या तोंडांनीं त्यांनीं ऐकल्या असल्यामुळें त्यांस विशेष स्फुरण चढून लढाईचा प्रसंग येण्याची ते वाट पाहात च होते. इतक्यांत त्यांस लढाईस जाण्याविषयीं श्रीमंतांचा हुकूम आला. तो ऐकून त्यांस बहुत संतोष झाला. नंतर त्यांनीं आपले फौजेची तयारी करून गडबोले यांस मदत करण्यासाठीं कूच केला.

वर लिहिल्याप्रमाणें पेशव्यांचे सरदार गडबोले हे फौजे नि-शीं खानदेशांत पोहोंचल्यावर फत्तेसिंग माने व अमीरखान पठाण यांच्या एकत्र फौजेची व त्यांची लवकरच गांठ पडून लढाई झा-ली. तिचा परिणाम असा झाला कीं, गोडबोले यांचा मोड होऊन पेशव्यांचे फौजेची दाणादाण झाली; यामुळें गडबोले ला-चार होऊन पुण्याकडे चालते झाले.

ह्या पराजयाचें वर्तमान नरसिंह खंडेराव यांचा गोदातीरीं मुक्काम असतां त्यांस समजलें. तेव्हां त्यांनीं आपले मा-लिक पेशवे यांस असें विनंतिपत्र लिहिलें कीं, " गडबोले यांचा पराजय होऊन ते निघून गेले; आतां मला आज्ञा होणें असेल ती सत्वर लिहून यावी. मी विंचुरा नजीक असून तेथें जाणार आहें व हुकूम येईल त्या प्रमाणें वागण्यास सिद्ध आहें. " या विनंतिपत्राचा जबाब त्यांस पेशव्यांकडून विंचुर येथें पोहोंचला. त्यांत असें लिहिलें होतें कीं, " यशवंतराव होळकर यानें मर्या-दा सोडून पुण्यावर हल्ला करण्याचे इराद्यानें पुष्कळ फौजेनिशीं कूच केला असें वर्तमान येथें आल्यावरून त्यास माघारां हांकून लावण्यास्तव येथें सरकारी व सरदारांच्या फौजा जमा होत आहेत. याकरितां तुह्मीही आपली दरोबस्त कायमची फौज व जितकी भरती करितां येईल तितकी नवीन फौज त्वरेनें भरून, ताबडतोब पुण्यास निघून यावें. " हा जबाब नरसिंगराव यांनीं आपले फौजेवरील मुख्य अधिकारी कोटमगांवकर यांस लागलाच

कळवून " जितकी फौज मिळवितां येईल तितकी सत्वर भरती करून पुण्यास हाजिर व्हावें "असा हुकूम केला आणि आपण स्वतः कायमचे फौजेनिशीं पुण्यास जाण्याची तयारी केली.

इतक्यांत त्यांस अशी खबर आली कीं, अमीरखानाचा भाचा अहमदखान हा मुखेड म्हणून विंचुरापासून पांच साहा कोसांवर एक गांव आहे तेथें तळ देऊन राहिला आहे; व त्याचा विचार पुढें पुण्याकडे जाण्याचा आहे. अमीरखानाचा कूच करण्याचा नेहमींचा क्रम असा असे कीं, त्यानें आपला भाचा अहमदखान यास आपले तळापासून आठ कोसांवर आपलें व फत्तेशिंग माने यांचे हाताखालचे फौजेनिशीं तळ देण्यास पुढें पाठवावें; आणि आपण स्वतः फत्तेशिंग माने यांस बरोबर घेऊन मागाहून कूच करावा. तो जवळ आला म्हणजे त्याच्या भाच्यानें पुढें कूच करावा. याप्रमाणें मुखेड गांवापासून सात आठ कोसांवर अमीरखानाचे फौजेचा तळ होता. अहमदखानाचा तळ मुखेडास असल्याची खबर नरसिंह खंडेराव यांस कळतांच शत्रू समीप आलेला असून आपण पुण्यास निघून गेलों असतां शत्रूस पाठ दाखविल्याप्रमाणें होईल, असें त्यांस वाटून त्यांनीं मुखेडावर जाण्याची तयारी केली. हें वर्तमान नरसिंहराव यांचे कारभारी मंडळास समजल्यावरून त्यांनीं त्यांस विनंती केली कीं, "आपणास सत्वर हाजिर होण्याविषयीं पुण्याहून हुकुम आला आहे. याकरितां इतर गोष्टींकडे लक्ष न पुरवितां तावडतोब पुण्यास जाणें अवश्य आहे." परंतु नरसिंहराव यानीं त्यांस निक्षून सांगितलें कीं, "लढाई करण्याचा हा प्रसंग मला प्रथमच आला आहे; त्यास मी पराङ्मुख होणार नाहीं; मग काय होणें असेल तें होवो." असा जबाब देऊन ते फौजेनिशीं निघुन मुखेडास पोहोंचलें, तों हेरांनीं त्यांस अशी बातमी कळविली कीं, शत्रूचे फौजेंत तोफा मुळींच नसून फक्त दोन तीन हजार स्वार मात्र आहेत व ते लढाईचे तयारीनें उभे

आहेत. त्यावरून आतां आपण एकाच हल्लयांत शत्रूंचा मोड करून टाकूं असें त्यांस वाटून त्यांनीं आपले फौजेंतील सरदारांची एकवाक्यता केल्यावर लागलाच हल्ला केला. अहमदखानही स्वतः तो हल्ला परतविण्यास पुढें आला. तेव्हां रणतुंबळ होऊन नरसिंहराव यांचे सुमारें आठ नऊशें स्वार नाश पावल्यावर त्यांनीं स्वतः अहमदखानास गांठून कत्तल केलें; आणि त्याचे फौजेचे पंधराशें स्वार मारून बाकीची फौज पळवून लाविली. याप्रमाणें नरसिंह खंडेराव यांचा जय झाल्यावर ते तळावर माघारें आले. कारभारी त्यांस भेटल्यावर सर्वांनीं त्यांस विनंति केली कीं, "येथून तीन कोसांवर गोदावरीस उतार आहे, त्यांतून आपण सत्वर पलीकडे निघून जाऊं; कारण गंगेचें पाणी वाढत चाललें आहे; महापूर आला तर कोठेंही उतार राहाणार नाहीं; आणि फौजेसुद्धां पुण्यास जाण्यास मोठी अडचण येईल." ती विनंति मान्य करून नरसिंहराव आपले सर्व फौजेनिशीं गोदातीरीं गेले, तों पाणी चढतांना त्यांचें दृष्टीस पडलें; परंतु धैर्य न सोडितां, सर्वांस उत्तेजन येण्यास्तव त्यांनीं आपले घोड्याचा जेरबंद कापून तो पाण्यांत घातला. तें पाहून सर्व स्वारांनींही आपले घोड्याचे जेरबंद कापून ते पुढें घातले. ईश्वरकृपेनें संपूर्ण लष्कर गोदापार उतरून जाऊन सर्वांनीं गोदेचे दक्षिणतीरीं मुक्काम केला. त्यावरून विंचुरकरांस गंगेनें (गोदेनें) मार्ग दिला असें लोक अद्यापि बोलतात.

आपला भाचा अहमदखान मारला जाऊन आपले फौजेचा विध्वंस झाला अशी खबर अमीरखान यास पोहोंचतांच, त्यास अत्यंत द्वेष चढून त्यानें शत्रूचा सूड घेण्याचा निश्चय केला, आणि ताबडतोब तयारी करून तो गोदेचे उत्तरकिनाऱ्यावर येऊन पोहोंचला; परंतु गोदेस मोठा पूर आल्यामुळें उतार नाहींसा होऊन त्याची पारजाण्याची उमेद खचली. तत्रापि त्याचा राग शांत न होतां नाउमेदीमुळें तो वृद्धिंगत झाला. सबब त्यानें विंचुरावर चाल केली; आणि तेथें पोहोंचतांच गांव लुटून खुद्द विंचुरकरांचे

वाड्यांत मुक्काम केला; आणि सावकाशीनें तो वाडा लुटून नंतर कूच करणार तों इतक्यांत होळकरांचा कोणी फणशे आडनावाचा आप्त सरदार त्यास मिळाला होता, त्यानें तो वाडा जाळण्याविषयीं त्यास चिथावून देऊन तें घोर कृत्य करण्यास्तव त्यांची परवानगी घेतली; आणि अमीरखान कूच करून गेल्यावर सदहू वाड्यांत कडबा व गवत भरून त्यास आग लावून दिली. तेव्हां आठ दिवसांत सर्व वाडा जळून त्याची राख होऊन गेली!

नरसिंहराव मजल दरमजल कूच करून निकडीनें पुण्यास जाऊन पोहोंचले. त्यांचे मुखें मुखेड येथील लढाईचें वर्तमान बाजीरावसाहेब पेशवे यांनीं ऐकिल्यावर त्यांची मर्जी खुष झाली. त्या प्रसंगीं पेशव्यांचे हुकुमावरून पुण्याजवळ सुमारें एक लाख फौज जमली होती. तींत मुखत्वें करून पेशवे यांचे तोफखान्यावरील सरदार गणपतराव पानशे हे आपले हाताखालचे तोफांसह; दौलतराव शिंदे यांचे एक सरदार भाऊ भास्कर हे कवाइती पायदळ पलटणांचा एक कंपू व लहान मोठ्या एकंदर सुमारें १५० तोफांनिशीं; आणि पेशव्यांचे हुजुरातीच्या ५२ पागांचे भालेवाले स्वार, असे सर्व लढाईचे तयारीनें पुण्याचे पुर्वेकडील मैदानांत तळ देऊन पडले होते. त्या फौजेंत विंचुरकर यांचीही फौज मिळाली.

येशवंतराव होळकरही एक जैय्यद फौजे निशीं निर्भयपणें जेजुरीस दाखल झाले. त्यानीं अमीरखान पठाण व फत्तेशिंग माने व आपले इतर सरदार या सर्वांचे हताखालच्या टोळ्या एकत्र केल्यामुळें त्यांजकडील फौजेची संख्या ५० हजारांवर होऊन त्यांनीं एकदम् पुण्याकडे चाल केली. त्यानीं हडपसर खेड्याचे पूर्वेस मैदानांत तळ दिला. तेव्हां पेशवे यांजकडून वकीलमार्फत त्यांजबरोबर दोन दिवसपर्यंत पुष्कळ प्रकारचीं बोलणीं झालीं; परंतु समेट न होता शेवटीं युद्धावरच मजल येऊन ठेपली.

तें पाहून नरसिंहराव यांनीं आपले फौजेंतील मुख्य अधिकारी व मानकरी लोक यांस एकत्र करून त्यांशीं थोडक्यांत भाषण

केलें. ते ह्मणाले कीं, "मित्रहो! माझे आजे व वडील यांजबरोबर प्रसंगोपात तलवार गाजविण्यांत सामील झालेले असे तुम्हांमध्यें जे कितीएक लोक आहेत त्यांस त्या प्रत्येक घोर संग्रामाचें स्मरण असेलच; परंतु मालिका समोर आपले कर्तव्यशक्तीचा उपयोग करण्याचा मला हा प्रथमच प्रसंग असून यांतच माझे योग्यतेचा निर्णय होणारा आहे. याकरितां मी आपली पराकाष्टा करीन; व तुम्हीही जसे माझे आजे यांचे झेंडयाखालींच लढत आहां असें समजून तुह्मांस या प्रसंगानुरूप माझी पाउ राखिली पाहिजे. तुमचे मनांत जर मी आपल्या पूर्वजांच्या बाहादुरीची बराबरी करावी असें असेल, तर तुम्ही झटून मला कुमक करा, म्हणजे मी कृतकृत्य होईन." हें भाषण ऐकून सरदार, मानकरी व पागे यांनीं एक विचारानें जबाब दिला कीं, "आपल्या निश्चयाप्रमाणें करण्यांत आम्हांकडून बिलकूल अंतर व्हावयाचें नाहीं. ज्या ठिकाणीं आपला एक केश पडेल त्या ठिकाणीं प्रथम आम्हां सर्वांचे देह खर्ची पडतील." याप्रमाणें परस्पर भाषण झाल्यावर मंडळी निरोप घेऊन आपापले डेऱ्यास निघून गेली.

दुसरे दिवशीं पेशवे व होळकर यांच्या फौजा लढाईचे तयारीनें मैदानांत उभ्या राहिल्या. पेशव्यांकडील फौजेचे मध्यभागीं शिंदे यांचा तोफखाना असून त्याचे मागें कवाइती पलटणें व त्यांचे उजवे बाजूस कवाइती स्वार असे उभे होते. त्यांचे उजवे बाजूस गणपतराव पानशे आपले तोफखान्यासहित असून त्यांचे पलीकडे सरकारी हुजुरात, विंचूरकर, रास्ते, बापू गोखले व इतर सरदार हे आपापल्या फौजांनिशीं होते. यशवंतराव होळकर यांनींही आपली कवाइती फौज व तोफखाना मध्यें ठेऊन त्यांचे दोन्ही बाजूस स्वार उभे केले होते; व आपण आपले फौजेचे पिछाडीस अमीरखान वगैरे बरोबर मसलत करीत उभे होते.